साऊथ इंडियन / पावभाजी / पंजाबी डिशेस / छोले भटूरे / पावभाजी / मिल्कशेक
खवय्यांसाठी खास पंजाबी छोले भटूरे
Sambar PURE - VEG | Aromas of South!
Restaurant Timing 8 AM to 11 PM
पार्सल सुविधा उपलब्ध..
एल.जी.शोरूम समोर, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो.- 85306 40202



संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

अधिक मासातील खास स्पेशल धोंडा थाळी
पूरण पोळी, आमटी, आमरस, पनीर भाजी, सूकी भाजी, आलू रजवडी, दालफ्राय अजुन बरेच काही..
स्पेशल आमरस 400/- किलो
पार्सल सुविधा उपलब्ध
महेंद्र पेडावाला रजवाडी गुजराती थाळी कापड बाजार, अहिल्यानगर.
रेल्वे पार्सल, किटी पार्टी व बर्थडे पार्टीसाठी खास सोय

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, मंगळवार दि. ०२.०६.२०२६ | अंक नं. ०५३ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

स्मार्ट असो वा मार्ट..मिल असो वा मॉल...
सर्वात स्वस्त देणार फक्त राजपाल !
आला रे आला राजपाल सेल आला..!
खरेदी | खरेदीवर पॉइंट | पॉइंटसवर गिफ्ट
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

22 कॅरेट सोन्याचा
सर्वात कमी भाव, सर्वात कमी मजुरी..
दागिन्यांची प्रतीग्रॅम मजुरी ₹ १११/-*
2014 पासून आपल्या सेवेत.. सोनेरी नातं..
चंदुकाका ज्वेल्स™
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02

## लोकशाही दिनाच्या नावाखाली शासनाची, नागरिकांची फसवणूक करणारी महानगरपालिका बरखास्त करावी

नगर – जिल्हाधिकारी कार्यालय आणि महानगरपालिकेत दरमहा होणारा लोकशाही दिन हा केवळ शासनाच्या दृष्टीने महत्त्वाचा उपक्रम आहे. मात्र, महापालिका कर्मचाऱ्यांसाठी हा दिवस थट्टेचा आणि चेष्टेचा विषय बनला आहे. काही कर्मचारी लोकशाही दिनात अत्यंत खोटी व शासनाला फसवणारी माहिती देत आहेत. शासनाच्या भूखंडावर दरोडा टाकणाऱ्या गुन्हेगारांवर कारवाई करण्याबाबत १२ ते १५ लोकशाही दिनांत आपण मुद्दा उपस्थित केला. मात्र, लोकांनी लोकशाही दिनात उपस्थित केलेल्या मुद्यांवर कारवाई केली जात नाही. त्यामुळे हे फसवे लोकशाही दिन बंद करावेत. लोकांची आणि शासनाची फसवणूक करणारी महापालिकाही बंद करावी आणि सर्व कर्मचाऱ्यांची सेवा तात्काळ समाप्त करण्यात यावी, अशी मागणी मुकुंद देवगावकर यांनी केली आहे.

शासनाच्या आदेशानुसार लोकशाही दिनाला सर्व विभागप्रमुखांची उपस्थिती अनिवार्य आहे आणि गैरहजर राहणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश आहेत. मात्र, तरीही अनेक विभागप्रमुख या आदेशाला केराची टोपली दाखवत असल्याचे देवगावकर यांनी पत्रात म्हटले आहे. ज्यांना निर्णय घेण्याचा अधिकार नाही, अशा कनिष्ठ कर्मचाऱ्यांना जाणीवपूर्वक उपस्थित केले जाते, तर जबाबदार अधिकारी स्वतःला सरकारचे मालक समजून लोकशाही दिनाकडे पाठ फिरवतात, असे ते म्हणाले.

देवगावकर यांनी लोकशाही दिनात मांडलेल्या गंभीर तक्रारींवर प्रशासनाकडून केवळ खोटी उत्तरे दिली जात असल्याचा आरोप त्यांनी केला. त्यांनी म्हटले आहे की, आतापर्यंतच्या लोकशाही दिनांमध्ये मी मांडलेल्या गुन्हेगारी स्वरूपाच्या तक्रारींवर प्रशासनाने एकही ठोस खुलासा दिलेला नाही. उलट, काही अधिकारी इतके सराईत खोटी उत्तरे देत आहेत की, त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी करण्याची वेळ आली आहे. लोकशाही दिनात उपस्थित केलेल्या अनेक प्रकरणांमध्ये शासनस्तरावरून कारवाईचे आदेश असूनही, महापालिका प्रशासन त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहे. सत्ताधारी लोकप्रतिनिधींच्या दबावामुळे प्रशासन कारवाई करण्यास असमर्थ असल्याचे चित्र आहे. यामुळेच लोकशाही दिन ही केवळ एक नौटंकी सुरू असल्याचा संताप त्यांनी व्यक्त केला. या फसव्या लोकशाही दिनावर तातडीने बंदी घालावी, अन्यथा महापालिका बरखास्त करून तेथील सर्व कर्मचाऱ्यांची सेवा तात्काळ समाप्त करावी, अशी मागणी मुकुंद देवगावकर यांनी मुख्यमंत्री आणि नगरविकास विभागाच्या प्रमुखांकडे केली आहे. लोकशाहीच्या नावाखाली सुरू असलेला हा प्रशासकीय खेळ कोण थांबवणार आणि दोषींवर कारवाई कोण करणार? असा सवालही त्यांनी केला.

## इन्स्टाग्रामवर बनावट खाते; तरुणीला अश्लील मेसेज

नगर – सोशल मीडियाचा गैरवापर करून तरुणीची बदनामी करणाऱ्या आणि तिच्या मनात लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करणाऱ्या एका विकृताविरुद्ध नगरच्या सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीने बनावट इन्स्टाग्राम खाते तयार करून या तरुणीला सातत्याने अश्लील आणि त्रासदायक संदेश पाठवले होते.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पीडित २६ वर्षीय तरुणी कोळगाव (ता.श्रीगोंदा) परिसरातील रहिवासी असून ती अंतर्गत सजावटकार म्हणून काम करते. आरोपी मोबाईल क्रमांक धारकाने पीडितेच्या नावाने इन्स्टाग्राम सोशल मीडिया संकेतस्थळावर वेगवेगळी बनावट खाती उघडली. यामध्ये त्याने तरुणीची बदनामी करण्याच्या उद्देशाने बनावट ओळख तयार केली.

या बनावट खात्यांच्या माध्यमातून आरोपीने पीडित तरुणीच्या अधिकृत इन्स्टाग्राम खात्यावर अत्यंत अश्लील, घाणेरडे आणि मनास लज्जा उत्पन्न होईल असे संदेश पाठवले. हा प्रकार एप्रिल महिन्यामध्ये नऊ ते दहा दिवसांच्या कालावधीत सातत्याने सुरु होता. या त्रासाला कंटाळून अखेर पीडितेने सायबर पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार नोंदवली. या तक्रारीवरून सायबर पोलिसांनी संबंधित मोबाईल क्रमांक धारक आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता तसेच माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या विविध कलमांनुसार गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक सागर ढिकले यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलीस अंमलदार सविता खताळ करत आहेत.

## तब्बल २६ तास मध्यवर्ती शहर अंधारात; कोठला परिसरात झाड कोसळल्याने वीज पुरवठा खंडीत

नगर – जोरदार वादळ आणि पावसामुळे ३१ मे रोजी रात्री ७.३० ते ८ वाजता वीज पुरवठा खंडीत झाला होता. तेंव्हापासून तब्बल २६ तास वीज पुरवठा खंडीत राहिला. त्यामुळे शहराचा मध्यवर्ती भाग असलेला गंज बाजार, सारडा गल्ली परिसर १ जून रोजी रात्री ९.३० वाजेपर्यंत पूर्णपणे अंधारात राहिला.

वादळामुळे कोठला परिसरातील दोन पोल, वीज वाहक तारा तुटलेल्या होत्या. आर्मीच्या हद्दीत ३० फूट लांब असलेले एक मोठे झाड वादळाने उन्मळून वीज वाहक तारांवर पडले होते. त्यामुळे पोल तुटले होते. तेथे पूर्ण लाईन टाकावी लागली. काही साहित्य बदलावे लागले. यात मोठा वेळ गेला. त्यानंतर १ जून रोजी सायंकाळी ७.३० वाजता हे काम पूर्ण झाले. पण तेथून जवळच असलेले अशोका फिडरचेही काम चालू होते. त्यामुळे मेन लाईन चालू करता येत नव्हती. रात्री ९.३० वाजेच्या दरम्यान काम पूर्ण झाल्यानंतर वीजपुरवठा सुरु करण्यात आला, अशी माहिती महावितरणकडून सांगण्यात आली.

घरगुती वापराच्या सावेडी व माळीवाडा भागातील अजूनही ४० ते ५० तक्रारी पेंडिंग आहेत. आज सर्व काम पूर्ण करून वादळामुळे विस्कळीत झालेला वीजपुरवठा पुर्ववत होईल. लघुदाबाच्या लाईनवरही झाडे पडली आहेत. त्यामुळे महावितरणला मोठ्या समस्यांचा सामना करावा लागला. पावसाळ्यापूर्वी महावितरणने वीज वाहक तारांच्या जवळ असणाऱ्या फांद्या तोडल्या होत्या. तथापि, झाडे तोडण्याची परवानगी मिळत नाही. पण वादळाने झाडेच उन्मळून पडल्यामुळे तारा व पोल तुटण्याचे प्रमाण वाढले. त्यामुळे वीज पुरवठा विस्कळीत झाला, असा खुलासा महाविरणकडून करण्यात आला.

### अन्यथा तीव्र आंदोलन करावे लागेल

महावितरणकडून वीज पुरवठा सुरळीत ठेवावा. वीज पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी महावितरणने उपाययोजना कराव्यात. अन्यथा, शहरातील व्यापारी, नागरिकांसह तीव्र आंदोलन करावे लागेल, असा इशारा भाजपचे शहर जिल्हा उपाध्यक्ष महावीर कांकरिया यांनी दिला.

### महावितरणचे मोठे नुकसान

वादळामुळे पोल पडणे, पोल तुटणे, तारा तुटणे तसेच इतर साहित्याची नासधूस होणे अशा विविध घटनांमुळे महावितरणचे मोठे नुकसान होते. याशिवाय ते साहित्य वेळेत उपलब्ध झाले नाही तर आणखी वेळ वाढतो. याशिवाय त्या दुरुस्तीसाठी मनुष्यबळही लागते. त्यामुळे अशा आपत्तीच्या काळात महावितरणचे होणारे नुकसान मोठे असते. तरीहीदेखील महावितरणकडून नागरिकांना वेळेत विद्युत पुरवठा व्हावा, यासाठी प्रयत्न केले जात आहेत, असे महावितणकडून सांगण्यात आले.

किंमतीत कमी.. क्वालीटीची हमी...
मजबुत टीकाऊ १२० किलो लोड पेलणारी ॲल्युमीनीयम लॅडर (शिडी)
3 ft. पासुन उपलब्ध
केवल अगरबत्ती
रसरंग मिसळ समोर अडते बाजार, अ.नगर

## विधानपरिषद निवडणूक एकतर्फी होणार की बिनविरोध? ४ जून रोजी माघारीच्या दिवशी होणार लढतीचे चित्र स्पष्ट

नगर – विधानपरिषद निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली असून, २ मे रोजी दाखल अर्जांची छाणनी करण्यात आली. यात सर्व अर्ज वैध ठरल्याचे निवडणूक विभागाकडून सांगण्यात आले. आता ही निवडणूक बिनविरोध होणार की उमेदवारांमध्ये लढत होणार, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत ४ जून रोजी संपणार असून, त्यानंतरच निवडणुकीचे अंतिम चित्र स्पष्ट होणार आहे. रिंगणात तुल्यबळ उमेदवार नसल्यामुळे सध्यातरी ही निवडणूक एकतर्फीच होणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

सध्याच्या घडीला निवडणुकीच्या रिंगणात प्राजक्त तनपुरे, करण ससाणे, दत्तात्रय पानसरे, कमलेश गांधी आणि मच्छिंद्र धुमाळ या ५ उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत. मात्र, जिल्ह्यातील राजकीय गणिते आणि महायुतीचे वर्चस्व पाहता, ही निवडणूक एकतर्फी होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

या निवडणुकीतील मतांचे गणित महायुतीच्या बाजूने झुकलेले आहे. भाजपकडे स्वतःची १९९ मते असून, महायुतीमधील इतर घटक पक्षांची मतेही त्यांच्या सोबत आहेत. याउलट महाविकास आघाडीकडे केवळ १०३ मते असल्याने, सुरुवातीपासूनच ही निवडणूक एकतर्फी मानली जात आहे. विशेष म्हणजे, ही निवडणूक बिनविरोध पार पडावी यासाठी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील विशेष प्रयत्नशील असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे.

अहिल्यानगरची विधानपरिषदेची जागा काँग्रेसला सोडण्यात आली होती. पक्षाकडून सुरुवातीला करण ससाणे यांच्या नावाची चर्चा होती. मात्र पराभवाचे गणित ओळखून त्यांनी निवडणूक लढवण्यास असमर्थता दर्शवली. त्यानंतर दीप चव्हाण यांना गळ घालण्यात आली. परंतु त्यांनीही तयारी दर्शवली नाही. त्यानंतर खा. निलेश लंके यांच्या पत्नी राणीताई लंके यांच्या नावाचा विचार झाला. मात्र वेळेअभावी त्यांनीही अर्ज दाखल केला नाही. अशा प्रकारे सक्षम उमेदवाराच्या शोधात असलेल्या महाविकास आघाडीला अखेर या जागेवर एकही उमेदवार मिळाला नाही. त्यामुळे महाविकास आघाडीने केलेल्या सर्व जागा लढविण्याच्या घोषणेला अहिल्यानगरमध्ये खोडा बसला.

### तनपुरे यांच्यासमोर आता अपक्षांचे आव्हान

काँग्रेसला तुल्यबळ उमेदवार न मिळाल्याने महाविकास आघाडीला अहिल्यानगरमध्ये उमेदवार देता आला नाही. आता पक्षाने इतर अपक्ष असलेल्या तुल्यबळ उमेदवारास पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे आता कोणत्या अपक्षाच्या पाठिमागे महाविकास आघाडी उभी राहते, हे ४ जूननंतरच समजणार आहे. महायुतीकडून प्राजक्त तनपुरे मैदानात आहेत. त्यांच्यासमोर ४ अपक्ष उमेदवारांचे आव्हान आहे. मात्र, तुल्यबळ उमेदवार नसल्याने ही लढत एकतर्फी होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. आता हे अपक्ष उमेदवार अर्ज माघारीच्या दिवशी माघार घेतात की मतदानापर्यंत मैदानात टिकतात, यावरच या निवडणुकीचे पुढील स्वरूप अवलंबून असेल. ४ जून रोजी होणारी माघार ही बिनविरोध की एकतर्फी निवडणूक याचा कौल देणारी ठरणार आहे.

### बॅलेटपेपरवर होणार मतदान

विधानपरिषदेच्या निवडणुकीत बॅलेटपेपरचा वापर होणार असल्याचे निवडणूक विभागाकडून सांगण्यात आले. प्रत्येक उमेदवारांच्या नावासमोर पसंतीक्रमानुसार मतदान करण्याचा अधिकार मतदारांना मिळणार आहे. मतदानानंतर मतमोजणी करताना पसंतीक्रमानुसार मोजणी होणार आहे. पहिल्या राऊंडमध्ये प्रथम पसंतीक्रमानेच जर निर्धारित कोटा पूर्ण केला तर संबंधित उमेदवाराला विजयी घोषित केले जाणार आहे. जर प्रथम पसंती क्रमाने कोटा पूर्ण केला नाही तर पुढील राऊंडमध्ये मोजणीची प्रक्रिया पार पाडली जाते.

परिमल मंगल पुजा कप साम्ब्राणी आपल्या भक्ती मध्ये आणील शक्ती
प्रत्येक शुभ कार्यास शुध्द, सुवासिक असली साम्ब्राणी (लोबान) कप
तसेच भारतवासी, निळकंठ, केशर चंदन, इंडियन कस्तुरी शुभलाभ, कापुर, शेंदूर, अत्तर
अगरबत्ती चे जिल्हा वितरक
केवल अगरबत्ती हॉटेल रसरंग समोर, आडते बाजार, अ.नगर.
वितरक नेमणे आहे

रूबी हॉल क्लिनिक, पुणे येथील प्रथितयश व निष्णात छाती (फुप्फुस) विकार व ॲलर्जी विकार तज्ञ
डॉ. स्नेहा तिरपुडे MD (Pulmonary Medicine), DNB (Pulmonary Medicine) Asthma Allergy Fellowship, King's College, London (UK)
- नियोजित अहिल्यानगर भेट -
गुरूवार 4 जून 2026 रोजी स.9 ते दु.2 पर्यंत
जर आपणांस खालील व्याधी असल्यास
• फुप्फुसाचे सर्व आजार • झोपे संबंधीचे सर्व विकार
• ॲलर्जी विकार • दमा • न्युमोनिया • न थांबणारा खोकला
प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या गुरूवारी अहिल्यानगर भेट
स्थळ : आनंदऋषिजी हॉस्पिटल, अहिल्यानगर
अधिक माहितीसाठी संपर्क : भरत : 8208783915

महात्मा फुले जन आरोग्य योजना
सर्व रंगाच्या शिधापत्रिका धारकांना मिळणार योजनेचा लाभ
MJPJAY
फक्त लहान मुलांसाठी मोफत आंतररुग्ण सेवा
अक्षय मुलांचे हॉस्पिटल व प्रसुतिगृह
बालिकाश्रम रोड, कॉस्मिक सोसायटी शेजारी, अ.नगर येथे उपलब्ध आहे.
त्यासाठी लागणारे कागदपत्रे : १) रेशन कार्ड सर्व रंगाचे २) आयुष्यमान कार्ड कुटुंबातील व्यक्तिचे ३) आधारकार्ड रुग्णाचे
अक्षय (गिते) हॉस्पिटल डॉ.अनिरुद्ध गिते (MBBS, MD paeds) मो : 9511110444 / 9881800444

ADMISSION OPEN
MAHA DISCOUNT JUST IN ANY COURSE 1800/-
www.dishagroup.in
An ISO 9001:2015 Certified DiSHA COMPUTER INSTITUTE
COURSES
MS-OFFICE, ADV. EXCEL, TALLY, GST, 2D CAD, 3D CAD
CORELDRAW, PHOTOSHOP, ILLUSTRATOR, INDESIGN
C, C++, CANVA, CHATGPT, BANKING, TAXATION
Delhi Gate Branch: 1st Floor, 204, Anand Keshav Heights, Above Supekar Medical, Delhi Gate. 9371051769
Old ST stand Branch: 1st Floor, Amber Plaza, Near Lokmanthan Office, Near Maliwada Stand, Station Road. 9371151769
Pipeline Branch: Second Floor, Rucha Garden, Bhistbag Chowk, Pipeline Road. 7447761769

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## बनावट युटीआरद्वारे महालक्ष्मी ऑटोमोटिव्हज शोरूमची ४१ लाखांची फसवणूक; दोघांच्या विरुद्ध गुन्हा दाखल

नगर - बनावट युटीआरद्वारे शहरातील शिल्पा गार्डन परिसरातील महालक्ष्मी ऑटोमोटिव्हज प्रायव्हेट लिमिटेड शोरूमची तब्बल ४१ लाख रुपयांची आर्थिक फसवणूक झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या संदर्भात शुभम संजय शिंदे (वय २७, रा. सदर बाजार, भिंगार) यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. शिंदे हे सदर शोरूममध्ये लेखापाल म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी पवन गुरुनाथ पांडव (रा. निर्मल नगर, सावेडी, अहिल्यानगर) आणि संतोष त्रिंबक दळवी (रा. भगवान निवास, निर्मल नगर, सावेडी, अहिल्यानगर) यांच्या विरुद्ध गुन्हा नोंदवला आहे. हा फसवणुकीचा प्रकार ३ जानेवारी २०२६ ते ७ मे २०२६ या कालावधीत शोरूममध्ये घडला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संशयित आरोपींनी आपसात संगणमत करून बँकेचे बनावट युटीआर क्रमांक तयार केले. हे बनावट क्रमांक त्यांनी फिर्यादी शुभम शिंदे आणि शोरूमचे मुख्य व्यवस्थापक सचिन चांदने यांच्या मोबाईलवर मेसेजद्वारे पाठवले. हे बनावट क्रमांक खरे असल्याचे भासवत आरोपींनी शोरूमची आणि प्रशासनाची दिशाभूल केली. याद्वारे शोरूमचे तब्बल ४१ लाख रुपये अडकवून आर्थिक फसवणूक करण्यात आली. या प्रकरणाचा प्राथमिक अर्ज चौकशीसाठी प्रलंबित होता. अखेर चौकशी पूर्ण झाल्यानंतर १ जून रोजी या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला. कोतवाली पोलीस ठाण्याचे प्रभारी पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक तेजश्री थोरात या गुन्ह्याचा पुढील तपास करत आहेत.



सीना नदी पूर नियंत्रण रेषा विचार मंचाच्या बैठकप्रसंगी आमदार संग्राम जगताप आदी.

# सीना नदीचे पात्र मोठे झाले तर रेड लाईन, ब्ल्यू लाईनची आवश्यकता भासणार नाही

### ब्लू लाईन आणि रेड लाईन बाबत फेरसर्वेक्षण करण्याची शासन दरबारी करणार मागणी; पूर नियंत्रण रेषा विचार मंचाच्या बैठकीत आ. संग्राम जगताप यांची ग्वाही

नगर - आपल्या शहरातील सीना नदीच्या पात्राचा खोलीकरण आणि रुंदीकरणाचा प्रश्न प्रलंबित होता. २०१६ साली नदीचे खोलीकरण आणि रुंदीकरण करण्याबाबत मागणी केली होती. त्याचे आदेश निघाले. मोजणी झाली. परंतु काम सुरु झाले नव्हते. त्यामुळे त्याचा सातत्याने पाठपुरावा करून सीना नदीच्या खोलीकरण, रुंदीकरण कामासाठी २० कोटी रुपयांचा निधी मंजूर करून आणला. आता त्याचे काम युद्धपातळीवर सुरु असून आगामी काळात हे पात्र मोठे आणि खोल झाले तर ब्ल्यू आणि रेड लाईनची आवश्यकता भासणार नाही. तसेच सीना नदी पूर नियंत्रण रेषेबाबतीत फेर सर्वेक्षण व्हावे, अशी मागणी आपण शासन दरबारी करणार आहोत, असे आश्वास आ. संग्राम जगताप यांनी दिले.

शहरातून वाहणाऱ्या सीना नदी तसेच संबंधित नाल्यांच्या पूरनियंत्रण रेषेमुळे बाधित झालेल्या जमीन व प्लॉटधारकांच्या प्रश्नांसाठी शहराचे आमदार संग्राम जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली सीना नदी पूरनियंत्रण रेषा विचार मंचची स्थापना करण्यात आली आहे. या मंचाची दुसरी बैठक अहिल्यानगर शहरातील नक्षत्र लॉन येथे आ. संग्राम जगताप यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यापूर्वीही या विषयावर शासनदरबारी पाठपुरावा करण्यात आला होता. मात्र सरकार बदलल्यानंतर हा प्रश्न पुन्हा नव्याने मांडण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार बाधित नागरिकांना एक व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी सीना नदी पूरनियंत्रण रेषा विचार मंच स्थापन करण्यात आला. या मंचाच्या माध्यमातून शासनाकडे ठोस भूमिका मांडून न्याय मिळवण्यासाठी संघटित लढा उभारण्याचा निर्धार बैठकीत व्यक्त करण्यात आला.

या बैठकीला माजी महापौर भगवान फुलसौंदर, किशोर डागवाले, बाबासाहेब वाकळे, गणेश भोसले, अनिल बोरुडे, दत्ता गाडळकर, महेश लोंढे, प्रकाश भागानगरे, शरद ठाणगे, प्रा. अरविंद शिंदे, विष्णू फुलसौंदर, गोरख बोरुडे, शंकर ठाणगे, राजेंद्र पडोळे, अशोक आगरकर, सुरेश खरपुडे, राजेंद्र एकाडे, राहुल व्यवहारे, रोहित व्यवहारे, सुडके, गाडीलकर, जाधव आदी उपस्थित होते. बैठकीदरम्यान नागरिकांनी आपल्या समस्या मांडत चुकीच्या पूरनियंत्रण रेषेमुळे होणाऱ्या आर्थिक व मानसिक नुकसानीबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. या बैठकीस आर्किटेक्ट इंजिनिअर असोसिएशनचे स्थापत्य अभियंता संजय पवार आणि प्रकाश जैन, आर्किटेक्ट रोहित साळुंके यांनी आपले विचार व्यक्त केले. अभियंता संजय पवार यांनी पूरनियंत्रण रेषेचे तांत्रिक पैलू, त्याचा नागरिकांवर होणारा परिणाम तसेच शासनस्तरावर कोणत्या पद्धतीने लढा द्यावा लागेल, याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

नगरसेवक गणेश भोसले म्हणाले, सर्व नागरिकांनी याबाबतच्या सूचना, आपले म्हणणे एकत्रित करून आ. संग्राम जगताप यांना सादर करावे, म्हणजे त्यांना हा विषय शासन दरबारी व्यवस्थित मांडता येईल. हा प्रश्न केवळ काही भागापुरता मर्यादित नसून संपूर्ण शहराच्या विकासाशी संबंधित असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

किशोर डागवाले म्हणाले, शहरातील बांधकाम क्षेत्राला नवसंजीवनी देण्यासाठी हा प्रश्न मार्गी लागणे अत्यावश्यक असल्याचे मत यावेळी अनेकांनी व्यक्त केले. पूरनियंत्रण रेषेमुळे हजारो प्लॉटधारकांची गुंतवणूक अडकून पडली असून, अनेक ठिकाणी विकासकामे थांबली आहेत. त्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला असून, शासनाने तातडीने निर्णय घेण्याची मागणी बैठकीतून करण्यात आली.

माजी महापौर भगवान फुलसौंदर म्हणाले, २०१९ मध्ये सीना नदी परिसरातील काही भागांमध्ये आखण्यात आलेल्या पूरनियंत्रण रेषेमुळे हजारो प्लॉटधारक, व्यापारी आणि नदीकाठावरील नागरिक अडचणीत सापडले आहेत. चुकीच्या पद्धतीने आखलेल्या नियंत्रण रेषेमुळे अनेक चांगले प्लॉट बांधकामासाठी अपात्र ठरले असून, नागरिकांना स्वतःच्या जागेवर घर किंवा व्यावसायिक इमारत उभारता येत नाही. काही अधिकाऱ्यांच्या चुकीच्या नियोजनामुळे ही गंभीर परिस्थिती निर्माण झाल्याचा आरोप त्यांनी केला. महाराष्ट्रात काही वर्षांपूर्वी आलेल्या मोठ्या पुरानंतर शासनाने पूरनियंत्रण रेषा आखण्याचा निर्णय घेतला होता; मात्र अहिल्यानगरमध्ये या रेषा वास्तव परिस्थितीचा अभ्यास न करता आखण्यात आल्याने शहराच्या विकासालाच मोठा फटका बसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# बोल्हेगावात दहशत पसरवणाऱ्या कोयता गँगला पोलिसांनी पकडले

### सराईत गुन्हेगारांवर एमआयडीसी पोलिसांची कारवाई, ३ धारदार कोयते केले जप्त



बोल्हेगावात दहशत पसरवणाऱ्या कोयता गँगला पकडल्यानंतर त्यांच्या समवेत एमआयडीसी पोलिसांचे पथक.

नगर - शहरातील बोल्हेगाव परिसरातील गणेश चौक येथे हातात लोखंडी कोयते घेऊन दहशत पसरवणाऱ्या चार जणांना एमआयडीसी पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. त्यांच्याकडून तीन धारधार लोखंडी कोयते जप्त करण्यात आले आहेत. हे सराईत गुन्हेगार असून त्यांच्या वर यापूर्वी अनेक गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असल्याचे पोलिसांनी सांगितले.

एमआयडीसी पोलीस स्टेशनचे स.पो.नि. माणिक चौधरी यांना ३१ मे रोजी रात्री गोपनीय माहिती मिळाली की, बोल्हेगाव येथील गणेश चौक परिसरात चार तरुण हातात कोयते घेऊन लोकांना शिवीगाळ करत आहेत आणि परिसरात दहशत पसरवत आहेत. या माहितीच्या आधारे पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली असता, संशयित तरुण मिळून आले. पोलिसांनी चौघांना घटनास्थळी पकडले. प्रेम नरेंद्र भाकरे (वय २३, रा. नागापूर), अभिषेक उर्फ भोऱ्या अरविंद भिंगारदिवे (वय २०, रा. नागापूर), बंट्या उर्फ प्रतिक बाबासाहेब शिंदे (वय २५, रा. नागापूर), संदेश रविंद्र आंग्रे (वय २१, रा. नवनागापूर) अशी त्यांची नावे आहेत.

यातील प्रेम भाकरे, अभिषेक भिंगारदिवे आणि प्रतिक शिंदे हे सराईत गुन्हेगार असून, त्यांच्यावर यापूर्वीही एमआयडीसी आणि तोफखाना पोलीस ठाण्यात गंभीर गुन्हे दाखल आहेत. या प्रकरणी एमआयडीसी पोलीस स्टेशनमध्ये भारतीय हत्यार कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने यांच्या मार्गदर्शनाखाली स.पो.नि. माणिक चौधरी आणि उपनिरीक्षक विकास जाधव, पोलिस अंमलदार राकेश खेडकर, सुभाष म्हस्के, सचिन आडबल, दीपक फुंदे, नवनाथ दहिफळे, किशोर जाधव, ज्ञानेश्वर आघाव, सुरज देशमुख, उमेश शेरकर यांच्या पथकाने केली आहे.

## कोळगाववाले बाबा यांचा ३ व ४ जून रोजी संदल व ऊरुस

नगर - सर्वधर्मियांचे श्रद्धास्थान असलेल्या हजरत सय्यद अहमदशहा अकबरशाह (रहे.) उर्फ कोळगाववाले बाबा यांचा संदल व ऊरुस दरवर्षीप्रमाणे यावर्षी ३ व ४ जून रोजी होत आहे. संदलच्या दुसऱ्या दिवशी ४ जून रोजी (गुरुवारी) दिवसभर होणाऱ्या भंडार्याचा सर्वधर्मिय भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन कोळगाववाले बाबा ऊरुस समितीतर्फे सर्व विश्वस्त, मुजावर व ऊरुस समिती आणि कोळगाव गावकर्यांतर्फे करण्यात आले आहे.

४ जून रोजी दिवसभर कोळगाव येथे भंडार्याच्या कार्यक्रमास भाविकांनी उपस्थित राहावे व प्रसादाचा लाभ घ्यावा. हा कार्यक्रम येथील हाजी करीमभाई हुंडेकरी यांच्यावतीने करण्यात येतो, अशी माहिती देण्यात आली. याच दिवशी रात्री ९ वाजता कव्वाल हैदर नाजा व तौसिफ जुनैदी यांच्या सुश्राव्य कव्वालीचा कार्यक्रम होत आहे.

# नगर - पुणे महामार्गावर अपघाताच्या वादातून तोडफोड करत गाडी पळवली

### चास शिवारातील घटना, दोघा जणांच्या विरुद्ध गुन्हा दाखल

नगर - नगर ते पुणे महामार्गावर चास गावच्या शिवारात अपघाताच्या कारणावरून झालेल्या वादात टोळक्याने फिर्यादीच्या नातेवाईकांना धक्काबुक्की करत वाहन बळजबरीने पळवून नेल्याची घटना ३१ मी रोजी रात्री १०.३० वाजण्याच्या सुमारास घडली आहे. याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात किशोर ब्राम्हणे आणि अमोल ब्राम्हणे (दोघे रा. वाडेगव्हाण, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर) यांच्यासह काही अनोळखी लोकांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत किरण बाळासाहेब शेटे (वय ३०, रा. चाकण, ता. खेड, जि. पुणे) यांनी फिर्याद दिली आहे. चास गावच्या शिवारामध्ये असणाऱ्या दुर्वा हॉटेलच्या शेजारी आणि भारत पेट्रोल पंपाच्या जवळ हा प्रकार घडला. फिर्यादी किरण शेटे यांच्या वाहनाला आरोपीने आपल्या ताब्यातील वाहन हलगर्जीपणे आणि भरधाव वेगात चालवून जोराची धडक दिली. या भीषण अपघातात दोन्ही वाहनांचे मोठे नुकसान झाले. अपघातानंतर आरोपींनी आपल्या गाडीच्या झालेल्या नुकसानीची भरपाई फिर्यादी यांच्याकडे मागितली. परंतु, फिर्यादी यांनी ही नुकसान भरपाई देण्यास नकार दिला.

याच गोष्टीचा राग मनात धरून आरोपी किशोर ब्राम्हणे, अमोल ब्राम्हणे आणि त्यांच्यासोबत असलेल्या अज्ञात लोकांनी फिर्यादी यांच्या नातेवाईकांना रस्त्यात अडवले. आरोपींनी नातेवाईकांना शिवीगाळ करत जोरदार धक्काबुक्की केली आणि त्यांना जबरदस्तीने धमकावले. यानंतर अपघातातील गाडी फिर्यादीच्या नातेवाईकांच्या ताब्यातून बळजबरीने टोईंग करून आरोपी अज्ञात ठिकाणी पळवून घेऊन गेले. याबाबत शेटे यांनी नगर तालुका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. या फिर्यादी वरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश वारुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार खंडेराव शिंदे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# एमआयडीसीतील कंपनीत कॉन्ट्रॅक्टच्या वादातून एचआर हेडला मारहाण करत लुटणारी टोळी पकडली

नगर - पारनेर तालुक्यातील सुपा एमआयडीसी येथील सिलॉन बेव्हरेज कॅन प्रा. लि. कंपनीमध्ये कॉन्ट्रॅक्ट मिळण्याच्या वादातून कंपनीच्या एच.आर. हेड संकेत संभाजी महाडीक (वय ३०, रा. उक्कडगाव, ता. श्रीगोंदा) यांना मारहाण करून सोनसाखळी हिसकावल्याची गंभीर घटना घडली आहे. याप्रकरणी सुपा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी या प्रकरणी वैभव रामदास रिकामे (वय २५, रा. गव्हाणवाडी, ता. श्रीगोंदा) याच्या सह २ अल्पवयीन मुलांना पकडले आहे. आरोपी वैभव रामदास रिकामे याने सतीश मोहन भालेकर यांच्या सांगण्यावरून कंपनीच्या एच.आर. हेडसंकेत महाडीक यांच्याकडे कॉन्ट्रॅक्ट मिळविण्यासाठी संपर्क साधला होता. मात्र कॉन्ट्रॅक्ट न मिळाल्याने आरोपींनी राग मनात धरून २६ मे रोजी बाबुर्डी ते विसापूर जाणाऱ्या रोडने रुईछत्रपती फाटा (ता. पारनेर) परिसरात महाडीक यांची मोटरसायकल अडवून सतीश मोहन भालेकर (वय ४२, रा. वडनेर हवेली, ता. पारनेर), वैभव रिकामे, अविनाश बोरकर (रा. वाडेगव्हाण), बादल आडे, तसेच ४ अल्पवयीन मुलांनी त्यांना मारहाण केली तसेच सुपा एमआयडीसीत कामाला यायचे नाही अशी धमकी दिली.



सुपा एमआयडीसी येथील कंपनीच्या एच.आर. हेडला मारहाण करून लुटणाऱ्या टोळीतील आरोपीला पकडल्यानंतर त्याच्या समवेत सुपा पोलिसांचे पथक.

त्यानंतर त्यांच्या गळ्यातील सोन्याची चैन हिसकावून आरोपी घटनास्थळावरून फरार झाले. या प्रकरणी पोलिसांनी वैभव रिकामे याला अटक केली असून २ अल्पवयीन मुलांना पकडून बाल न्याय मंडळासमोर हजर करण्यात आले. उर्वरित आरोपी अद्याप फरार असून त्यांचा शोध सुरू आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक ज्योती गडकरी यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. सदरची कारवाई पोलिस निरीक्षक श्रीमती ज्योती गडकरी, पोलीस उपनिरीक्षक मंगेश नागरगोजे, पो.हे.कॉ.अशोक मरकड, पो.हे.कॉ. संदीप माळवदे, पो. कॉ. योगेश सातपुते, पो. कॉ. मेघराज कोल्हे, पो.कॉ. विकास गायकवाड यांनी केली आहे.

### उद्योजकांना पोलिसांचे आवाहन

सुपा व म्हसणे फाटा एमआयडीसी मधील सर्व कंपनीचे व्यवस्थापक यांना सुपा पोलिसांनी आवाहन केले आहे की, आपल्या कंपनीमध्ये आपणास कोणत्याही प्रकारचे कॉन्ट्रॅक्ट मिळणेबाबत आपणास कोणी वैयक्तिक अथवा गटाद्वारे दमदाटी करणे, पैशांची मागणी करणे, शिवीगाळ करणे, दबाव टाकणे व इतर प्रकारे कोणताही त्रास देत असेल तर आपण तात्काळ सुपा पोलीस स्टेशन दुरध्वनी क्रं-०२४८८२१३२३३/ डायल ११२ तसेच पोलीस निरिक्षक ज्योती गडकरी मो.क्रं-९७६३८९०२२३ या नंबरशी संपर्क करावा. सुपा पोलीस स्टेशन मार्फतीने एमआयडीसी मधील औद्योगिक क्षेत्रामध्ये कोणत्याही प्रकारची गुन्हेगारी प्रवृत्ती व गुन्हेगारी खपवुन घेतली जाणार नाही, असा इशाराही पोलिसांनी दिला आहे.

## नवनागापुर येथे तरुणाची आत्महत्या

नगर - राहते घरात गळफास घेत एका तरुणाने आत्महत्या केल्याची घटना नवनागापुर येथील चेतना कॉलनी परिसरात १ जून रोजी सकाळी उघडकीस आली. कल्याण भास्कर चव्हाण (वय ३६) असे मयत तरुणाचे नाव आहे.

कल्याण याने घरात गळफास घेतल्याचे निर्दशनास येताच त्याच्या नातेवाईकांनी त्यास तातडीने खाजगी रुग्णवाहिकेने उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात नेले. तेथील मेडिकल ऑफिसर डॉ. बोरुडे यांनी त्यास तपासून उपचारापूर्वीच मयत घोषित केले. याबाबतचा अहवाल एमआयडीसी पोलिसांना पाठविण्यात आला. त्यावरून पोलिसांनी आकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

## गोविंददेव कवडे यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर - अहिल्यानगर येथील जेष्ठ नागरिक विरशैव कक्कया



समाजाचे समाजसेवक, पारशा खुंट येथील जी के कवडे लेदर स्टोअर्सचे संचालक गोविंददेव खंडुजी कवडे (वय ८९, रा.ओबेरॉय हॉटेल समोर, गायकवाड कॉलनी) यांचे वृद्धापकाळाने अहिल्यानगर येथे २८ मे रोजी दुःखद निधन झाले.

त्यांचा अंत्यविधी अमरधाम स्मशानभूमी येथे २९ मे रोजी झाला. ते रविंद्र कवडे (आर के इंडस्ट्रिज्, एमआयडीसी) यांचे वडील होत. त्यांच्या मागे मुलगा, सून, २ मुली, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गोदावरी-कृष्णा खोरे कार्यालय स्थलांतराविरोधात आंदोलन तीव्र

### दुसऱ्या दिवशीही कामबंद कायम; स्थलांतर निर्णय तातडीने रद्द करा; अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा



गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळांतर्गत शहरातील कार्यालयांच्या प्रस्तावित स्थलांतराच्या निर्णयाविरोधात मुळा पाटबंधारे जलसिंचन भवनातील कर्मचाऱ्यांचे कामबंद आंदोलन २ जून रोजी सलग दुसऱ्या दिवशीही सुरू राहिले.

नगर - गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळांतर्गत शहरातील कार्यालयांच्या प्रस्तावित स्थलांतराच्या निर्णयाविरोधात मुळा पाटबंधारे जलसिंचन भवनातील कर्मचाऱ्यांचे कामबंद आंदोलन २ जून रोजी सलग दुसऱ्या दिवशीही सुरू राहिले. राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना, अहिल्यानगर शाखेच्या नेतृत्वाखाली कर्मचाऱ्यांनी निदर्शने करत शासनाच्या निर्णयाचा निषेध नोंदविला. तसेच कार्यालयांचे स्थलांतर तातडीने रद्द न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला. आंदोलनात राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेचे अध्यक्ष सुभाष तळेकर, सरचिटणीस रावसाहेब निमसे, उपाध्यक्ष अशोक मासाळ, वैशाली बोडखे, मृदुला भोर, उषा देवकाते, गंगासागर उगले, अनिता निकाळजे, अश्विनी कोंडा, शुभांगी लवांडे, पल्लवी सोनवणे, प्रतीक्षा औटी, स्नेहल राऊत, राधा चौधरी, संजीवनी गायकवाड, अश्विनी भगत, दीपा सातपुते, प्रियंका म्हस्के, शिल्पा ताजणे, पल्लवी तोडमल, अश्विनी देवराय, संगीता कार्ले, विजय तोडमल, देविदास पाडेकर, दीपक गीते, रवींद्र कोडम, रोहित निमसे, प्रसाद कराळे, प्रशांत आठरे, मनोज देशमुख, राजेश जाधव, संतोष गांगर्डे, किशोर गांगर्डे, कृष्णा आंधळे, आदिनाथ कराळे, रवींद्र तवळे, दत्ता सावरे, संतोष कासार, पोपट जायभाय, जालिंदर सुपेकर यांच्यासह जलसंपदा विभागातील अधिकारी, कर्मचारी व विविध संघटनांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते.

संघटनेच्या वतीने सांगण्यात आले की, जलसंपदा विभागातील सिंचन महामंडळांच्या कामकाजावर शासनाचे नियंत्रण असताना शासन व विभागाची पूर्वमान्यता न घेता विविध कार्यालयांच्या स्थलांतराचे आदेश काढण्यात आले आहेत. या निर्णयामुळे प्रशासकीय कामकाजात अडथळे निर्माण होण्याबरोबरच शेतकरी, कर्मचारी, लोकप्रतिनिधी आणि नागरिकांची मोठी गैरसोय होणार आहे.

विशेषतः सन १९३० पासून अहिल्यानगर येथे कार्यरत असलेल्या अहिल्यानगर पाटबंधारे विभागाचे लोणी (ता. राहाता) येथे, तर सन १९७२ पासून कार्यरत असलेल्या मुळा पाटबंधारे विभागाचे राहुरी येथे स्थलांतर करण्याच्या प्रस्तावाला कर्मचाऱ्यांनी तीव्र विरोध दर्शविला आहे. जिल्हास्तरीय प्रशासकीय कामकाजासाठी आणि लाभधारकांच्या सोयीच्या दृष्टीने ही कार्यालये अहिल्यानगर मुख्यालयातच कायम ठेवणे आवश्यक असल्याचे आंदोलनकर्त्यांचे म्हणणे आहे.

तसेच मुख्य अभियंता (जसं) जलसंपदा विभाग, पुणे यांचे कार्यालय कोल्हापूर येथे, मुख्य अभियंता (विप्र) जलसंपदा विभाग, पुणे यांचे कार्यालय सोलापूर येथे आणि मुख्य अभियंता (जसं) जलसंपदा विभाग, संभाजीनगर यांचे कार्यालय नांदेड येथे स्थलांतरित करण्याच्या प्रस्तावालाही विरोध करण्यात आला आहे. प्रादेशिक मुख्यालयांमध्येच ही कार्यालये कार्यरत राहणे अधिक उपयुक्त असल्याचा दावा संघटनेने केला.

स्थलांतरामुळे रिक्त होणाऱ्या जागांवर भविष्यात अतिक्रमण होण्याची शक्यता असल्याची भीती व्यक्त करत प्रशासकीय, सामाजिक व सार्वजनिक हिताचा विचार करून हा निर्णय तातडीने रद्द करावा, अशी मागणी मुख्यमंत्री यांच्याकडे करण्यात आली आहे. शासनाने त्वरित सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

# गृहिणी

## आरोग्य

### खा काळे टोमॅटो...

सामान्य लाल टोमॅटो आपण रोजच्या जेवणात वापरतो, परंतु हल्ली बाजारात काळसर-जांभळ्या रंगाचे टोमॅटो दिसू लागले आहेत ज्यांना 'काळे टोमॅटो' किंवा 'इंडिगो रोझ टोमॅटो' म्हणतात. लाल टोमॅटोपेक्षा यामध्ये अँटिऑक्सिडंटचे प्रमाण कितीतरी पटीने जास्त असते, त्यामुळे आरोग्यासाठी हे विशेष फायदेशीर ठरतात.काळ्या टोमॅटोमध्ये मुबलक प्रमाणात अँथोसायनिन असल्यामुळे ते शरीरातील फ्री रॅडिकल्सशी लढतात आणि पेशींचे नुकसान होण्यापासून वाचवतात, ज्यामुळे वृद्धत्वाची प्रक्रिया मंदावते आणि त्वचा तजेलदार राहते. यातील लायकोपीन आणि व्हिटॅमिन सी रोगप्रतिकारक शक्ती वाढवते, त्यामुळे सर्दी-खोकल्यासारखे आजार लांब राहतात. हृदयाच्या आरोग्यासाठीही हे उपयुक्त आहेत कारण अँथोसायनिन रक्तवाहिन्या लवचिक ठेवते, रक्तदाब नियंत्रित करण्यास मदत करते आणि वाईट कोलेस्टेरॉल कमी करते. काळ्या टोमॅटोमध्ये असलेले व्हिटॅमिन ए आणि ल्युटीन डोळ्यांचे आरोग्य जपतात आणि वाढत्या वयात होणारा मोतीबिंदूचा धोका कमी करतात. यातील पोटॅशियम व फायबर पचनसंस्था सुधारतात, बद्धकोष्ठतेचा त्रास कमी करतात आणि वजन आटोक्यात ठेवण्यास मदत करतात. संशोधनानुसार अँथोसायनिनमध्ये कर्करोगाच्या पेशींची वाढ रोखण्याची क्षमता असते, विशेषतः प्रोस्टेट, स्तन आणि पोटाच्या कर्करोगापासून संरक्षण मिळू शकते. मधुमेहींसाठीही हा टोमॅटो चांगला आहे कारण त्याचा ग्लायसेमिक इंडेक्स कमी असतो आणि तो रक्तातील साखर अचानक वाढू देत नाही. याशिवाय यातील व्हिटॅमिन के आणि कॅल्शियम हाडे मजबूत करतात, तर लोह रक्तातील हिमोग्लोबिन वाढवून अॅनिमिया दूर ठेवतो. नियमितपणे काळे टोमॅटो सॅलड, सूप किंवा भाजीतून खाल्ल्यास त्वचेवरील डाग कमी होतात, केसांची वाढ चांगली होते आणि मेंदूची कार्यक्षमता वाढून स्मरणशक्ती तल्लख राहते.

## पाककला

### ठेचा पराठा

**साहित्य :** हिरवी मिरची १५, लसूण १० पाकळ्या, शेंगदाणे २ चमचे, जिरे १ चमचा, कोथिंबीर, मीठ, तेल, लिंबू, गव्हाचे पीठ २ कप, मीठ, तेल/तूप, ओवा.

**कृती :** मिरची, लसूण, जिरे, शेंगदाणे, मीठ खलबत्त्यात जाडसर ठेचून घ्या. २ चमचे तेलात ठेचा. ३ मिनिट परतून गॅस बंद करा, कोथिंबीर व लिंबू रस मिक्स करा. गव्हाच्या पिठात मीठ, ओवा, २ चमचे तेलाचे मोहन घालून मऊ पीठ मळून १५ मिनिट झाका. पिठाचा गोळा लाटून त्यात १ चमचा ठेचा भरून कडा बंद करा. हलक्या हाताने जाडसर पराठा लाटा, ठेचा बाहेर येऊ देऊ नका.गरम तव्यावर पराठा दोन्ही बाजूंनी तूप/तेल सोडून खरपूस भाजा. ठेचा कोरडा परतल्यामुळे पराठा फुटत नाही. गरमागरम पराठा दही, लोणचं किंवा चहासोबत सर्व्ह करा, वर लोणी घाला.

## वास्तू

### बीम संबंधी...

* बेडच्या बरोबर वर छताचा बीम येणार नाही याची काळजी घ्या. बीमखाली झोपल्याने डोकेदुखी, ताण आणि आजारपण वाढते.

* बेड बीमखाली येत असेल तर फॉल सिलिंग करून बीम झाका. बीम दिसणार नाही अशी व्यवस्था करा, दोष कमी होतो.

* बीम झाकणे शक्य नसल्यास बीमवर दोन बांबूच्या बासरी ४५ अंशाच्या कोनात लाल दोऱ्याने बांधा. नकारात्मक ऊर्जा कट होते.

* गॅस शेगडी किंवा स्वयंपाकाचा मुख्य ओटा बीमखाली येऊ देऊ नका. अन्नावर बीम चा भार आल्याने घरात आजारपण राहते.*

* जेवणाचे टेबल बीमखाली असेल तर घरात पैशाची चणचण निर्माण होते.

## सौंदर्य

* १ चमचा कॉफी पावडर + १ चमचा खोबरेल तेल मिक्स करून २ मिनिट स्क्रब करा. आठवड्यातून २ वेळा. डेड स्किन आणि टॅन निघतो.

* रात्री १० मिनिट साय चेहऱ्यावर चोळा आणि मग धुवा. कोरड्या त्वचेचा टॅन जातो आणि चेहरा मऊ होतो.

* पिकलेली पपई कुस्करून त्यात १ चमचा मध घाला. २० मिनिट चेहऱ्यावर ठेवा. पपईतले एन्झाइम्स डेड स्किन काढून टॅन घालवतात.

## सल्ला

महिन्यातून एकदा ट्रॉली काढून व्हिनेगर + पाण्याने पुसा. झुरळे होत नाहीत. ट्रॉली बसवताना मागे २ इंच जागा सोडा म्हणजे हवा खेळती राहते.

संकलक : अॅड. सौ. पूजा गुंदेचा

## दैनिक पंचांग

बुधवार, दि. ३ जून २०२६

**संकष्ट चतुर्थी, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, अधिक ज्येष्ठ कृष्णपक्ष, पू.षा. २५।००, सूर्योदय ०६ वा. ३१ मि. सूर्यास्त ०५ वा. २९ मि.**

### राशिभविष्य

मेष : नवीन कामाची सुरुवात होईल. प्रवास घडेल.

**वृषभ :** जुन्या गुंतवणुकीतून लाभ होईल. कुटुंबासोबत वेळ जाईल.

**मिथुन :** दिवस धावपळीचा राहील. संध्याकाळी मित्र भेटतील.

**कर्क :** नोकरीत वरिष्ठांची मदत मिळेल. मन अस्वस्थ राहील.

**सिंह :** व्यवसायात नवीन संधी मिळेल. प्रभाव वाढेल.

**कन्या :** खर्च वाढेल. विद्यार्थ्यांसाठी अनुकूल काळ आहे.

**तूळ :** भागीदारीतून फायदा होईल. प्रेमात यश मिळेल.

**वृश्चिक :** कामाचा ताण राहील. मेहनतीचे फळ मिळेल.

**धनु :** नशीबाची साथ मिळेल. मुलांकडून बातमी मिळेल.

**मकर :** जुने येणे वसूल होईल. पोटासंबंधी त्रास संभवतो.

**कुंभ :** नवीन ओळखी होतील. त्या भविष्यात उपयोगी पडतील.

**मीन :** दिवस संमिश्र जाईल. गैरसमज होण्याची शक्यता आहे.

## शब्दगंध क्र. ७४४३

सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | ■ | ३ | ४ | ५ | ६ |
| | ■ | ७ | | | | | |
| ८ | ९ | | ■ | | ■ | | ■ |
| १० | | | ■ | ११ | १२ | ■ | १३ |
| ■ | | ■ | ■ | ■ | १४ | | |
| १५ | | ■ | १६ | | | ■ | |
| १७ | | १८ | | ■ | १९ | २० | ■ |
| २१ | | | | | ■ | २२ | |

**आडवे शब्द :-** १) भारताचे कायदेमंडळ; पार्लमेंट ३) स्त्रियांचे एक वस्त्र ७) मनसब धारण करणारा ८) भिजविलेल्या व मळलेल्या पदार्थाचा गोळा; खोटे सोने १०) मोठे गाव; शहर ११) मोठी गोटी; वरचा भाग; आच्छादन १४) लागून; जवळ १५) आकाश; गगन; अंबर १६) मान्य; आवडलेले १७) हाणाहाणी १९) झाकण असलेले भांडे २१) पेशव्यांचा ध्वज २२) कथिल व शिसे यांचा मिश्र धातू

**उभे शब्द :-** १) गोळा करणे; जमविणे २) उत्साही; धीराचा; निश्चयाचा; दीर्घोद्योगी ३) पसरलेले; विस्तृत ४) अरबी देव ५) केव्हाही ६) रड; रडगाणे ९) आकाशात उंच घेतलेली झेप १२) पलीकडची बाजू; पैलतीर १३) एक विषम संख्या १५) मुस्लिमांची प्रार्थना १६) रजक; धोबी १८) गणित; प्रमाण; मेजरमेंट २०) खाट; पलंग

### शब्दगंध क्र. ७४४२ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| इ | ति | हा | स | ■ | भ | का | स |
| मा | र | ■ | मा | धा | र | ■ | ■ |
| र | क | म | ■ | त | ब | ■ | क |
| त | स | रा | ळे | ■ | सा | ध | क |
| ■ | ■ | ठ | ■ | दा | ■ | न | त |
| म | न | मो | ह | न | सिं | ग | ■ |
| का | व | ळा | ■ | ■ | च | र | क |
| न | स | ■ | वि | ज्ञा | न | ■ | र्ण |

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार :** जगण्यासाठी हवेतला श्वास आणि आयुष्यातला विश्वास, दोन्ही महत्वाचे आहेत. श्वास थांबला तर जीवन संपते आणि विश्वास तुटला तर नाती संपतात.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### उन्हाळ्यात काळे कपडे घालणे नेहमीच चुकीचे असते का?

उन्हाळ्यात काळे कपडे घालणे नेहमीच चुकीचे असते असे म्हणता येणार नाही, कारण हा विषय फक्त रंगापुरता मर्यादित नाही. सर्वसामान्यपणे आपण ऐकतो की काळा रंग उष्णता शोषून घेतो आणि पांढरा रंग परावर्तित करतो, त्यामुळे उन्हाळ्यात पांढरेच कपडे घालावेत. विज्ञानाच्या दृष्टीने हे खरे आहे की थेट सूर्यप्रकाशात काळ्या वस्तूचे बाह्य पृष्ठभाग पांढऱ्या वस्तूपेक्षा लवकर गरम होते, आणि काळ्या टी-शर्टचे तापमान पांढऱ्या टी-शर्टपेक्षा पाच ते दहा अंशांनी जास्त असू शकते. परंतु इथे महत्त्वाचा मुद्दा हा आहे की गरम कपडा होणे आणि आपले शरीर गरम होणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत, आणि शरीराचे तापमान फक्त कपड्याच्या रंगावर अवलंबून नसते.

याचे सर्वात चांगले उदाहरण म्हणजे सहारा वाळवंटातील बेडुइन लोक. ते प्रचंड उष्णतेतही काळ्या रंगाचे, लांब आणि सैलसर झगे घालतात. १९८० साली Nature या विज्ञानपत्रिकेत यावर संशोधन झाले, ज्यात काळे, पांढरे, खाकी झगे आणि झगा न घालता शरीराचे तापमान मोजले गेले. निकाल असा आला की सर्व प्रकारच्या झग्यांमध्ये शरीराचे तापमान जवळपास सारखेच राहिले, म्हणजे काळ्या झग्यामुळे जास्त गरम झाले नाही. यामागे 'चिमणीचा परिणाम' नावाची प्रक्रिया काम करते. सैल काळ्या झग्याने सूर्याची उष्णता शोषली की झग्याखालची हवा गरम होऊन हलकी होते आणि गळ्यावाटे वर निघून जाते, तर त्याजागी खालून थंड हवा आत येते. अशा सततच्या हवेच्या प्रवाहामुळे घाम सुकतो आणि शरीर थंड राहते.

याशिवाय काळा रंग शरीरातून बाहेर पडणारी उष्णता लवकर बाहेर टाकायलाही मदत करतो. पण हा परिणाम तेव्हाच दिसतो जेव्हा कपडे सैलसर असतात आणि हवा खेळती राहते. म्हणूनच काळे कपडे कधी टाळावेत हे समजून घेणे गरजेचे आहे. जर तुम्ही घट्ट फिटिंगची काळी जीन्स, स्किनी पॅन्ट किंवा अंगाला चिकटणारे टी-शर्ट घातले, तर कपडा आणि त्वचा यामध्ये हवेचा थरच तयार होत नाही. अशा वेळी काळ्या रंगाने शोषलेली उष्णता थेट त्वचेपर्यंत पोहोचते आणि प्रचंड गरम होते. त्यातही जर कापड पॉलिस्टर किंवा नायलॉनसारखे सिंथेटिक असेल, तर ते घाम शोषत नाही आणि बाष्पीभवन होत नसल्याने शरीर थंड होत नाही. त्यामुळे दुपारच्या कडक उन्हात, वारा नसलेल्या ठिकाणी, घट्ट सिंथेटिक काळे कपडे घालणे नक्कीच चुकीचे ठरते.

याउलट, योग्य कापड आणि डिझाईन निवडल्यास उन्हाळ्यात काळे कपडे आरामदायक ठरू शकतात. शंभर टक्के सुती, लिनन, खादी किंवा बांबू फॅब्रिकसारखे नैसर्गिक कापड हवा खेळती ठेवतात आणि घाम शोषून लवकर सुकवतात. जर असा कपडा सैलसर असेल, जसे की काफ्तान, झब्बा, पलाझो, सैल कुर्ता किंवा ओव्हरसाईज्ड शर्ट, तर बेडुइन झग्यासारखाच परिणाम मिळतो आणि शरीर थंड राहते.

ऑफिसमध्ये एसी असेल, संध्याकाळी बाहेर पडणार असाल किंवा कार्यक्रम सावलीत असेल, तर काळा रंग बिनधास्त वापरता येतो, कारण फॅशनच्या दृष्टीने तो नेहमीच सुरक्षित पर्याय मानला जातो. कधी कधी काळ्या कपड्याखाली पातळ पांढरे सुती इनर घातल्यास ते उष्णता थेट त्वचेपर्यंत पोहोचू देत नाही.एकंदरीत विचार केला तर उन्हाळ्यात काळे कपडे घालणे नेहमीच चुकीचे हे विधान पूर्णपणे बरोबर नाही. घट्ट, जाड, सिंथेटिक काळे कपडे थेट उन्हात घातले तर त्रास होणारच, पण सैलसर, सुती, हवेशीर काळा कुर्ता घट्ट पांढऱ्या टी-शर्टपेक्षा जास्त थंडावा देऊ शकतो. म्हणून कपाटातून कपडे निवडताना फक्त रंग न बघता कापड कोणते आहे, फिटिंग कसे आहे आणि तुम्ही कुठे जाणार आहात याचा विचार करणे जास्त महत्त्वाचे ठरते, कारण उन्हाळ्याचा खरा मंत्र रंगापेक्षा हवेशीर कापड हा आहे.

### प्लॅस्टिकची बाटली

एकदा एका मुलाने थंडगार कोल्ड्रिंक पिऊन रिकामी प्लास्टिकची बाटली रस्त्याच्या कडेला फेकून दिली. बाटलीला खूप वाईट वाटले कारण तिला वाटले की आपले आयुष्य संपले, आता आपण फक्त कचरा आहोत. पावसाचे पाणी आले आणि तिला वाहून नेत नदीत सोडले. नदीत पोहताना एक छोटा मासा तिच्या तोंडात अडकला आणि जीवाच्या आकांताने तडफडू लागला.

बाटलीला स्वतःचाच राग आला, माझ्यामुळे एका निष्पाप जीवाचा बळी जाणार असे तिला वाटले. त्याच वेळी रिया नावाची एक छोटी मुलगी नदीकाठी खेळत होती. तिने माशाची तडफड पाहिली आणि क्षणाचाही विचार न करता पाण्यात उडी मारून बाटली बाहेर काढली. तिने अलगदपणे माशाला सोडवले आणि तो आनंदाने पाण्यात नाहीसा झाला. रियाने ती बाटली उचलली आणि घरी घेऊन गेली. आईच्या मदतीने तिने बाटली स्वच्छ धुतली, अर्धी कापून त्यात माती भरली आणि खिडकीत ठेवून त्यात तुळशीचे रोप लावले.

रोज ती रोपाला प्रेमाने पाणी घालू लागली. हळूहळू तुळस बहरली आणि बाटलीला नव्याने जगण्याचा अर्थ कळला. ती आता कचरा नव्हती तर एका रोपाचे घर होती, ऑक्सिजन देणाऱ्या झाडाचा आधार होती. शेजारीपाजारी लोकांनी रियाची ही कल्पना पाहिली आणि त्यांनीही घरातल्या जुन्या बाटल्यांचा असाच वापर करायला सुरुवात केली.

बघता बघता सगळ्या गावात बाटल्यांच्या कुंड्या दिसू लागल्या आणि नदीही स्वच्छ झाली कारण कोणीच आता बाटल्या फेकत नव्हते. त्या दिवशी बाटलीला समजले की आपण कधीच निरुपयोगी नसतो, फक्त आपल्याला योग्य हात आणि योग्य विचार मिळायला हवा.

बोध : प्रत्येक गोष्टीला दुसरी संधी देता येते. फेकून देणे हा शेवटचा पर्याय नसतो.

## जीवन का अमृत (भाग १)



### सदाचार

यह हमारा ध्यान जीवन के सदाचारी पक्ष की ओर मोड़ने में सहायता करती है, क्योंकि रूहांनी तरक्की के साथ-साथ, यह पक्ष भी विकसित होना जरूरी है। याद रखो, पिता अपने पुत्र को गले लगाना चाहता है। यदि बच्चे के कपड़े मिट्टी या गंदगी से भरे हों, तो वह उसे छोड़ेगा नहीं, बल्कि उसे साफ करेगा और अपनी गोदी में बैठाएगा। वह सदा अपने बच्चों के साथ है, जिनके प्रति उसका प्यार माँ के प्यार से सौ गुणा ज्यादा है। मुझे खुशी है कि ७ जून को आपने सत्गुरु को अपने साथ चलते हुए महसूस किया, आपके तनाव का भारी बोझ ढोते हुए और दूसरों के द्वारा आपके साथ किए गए दुर्व्यवहार से पैदा हुई मानसिक प्रतिक्रिया को शांत करते हुए और इससे आपकी आत्मा को बल मिला।

जब तक आप संसार में रहते हैं, आपको अवश्य ही कार्य करते रहना होगा। आप महत्त्वाकांक्षा के साथ दिल लगातार कार्य करें, उसी में सारी खूबसूरती समाई है। सारी सृष्टि सुंदर है। आप प्रभु से प्रेम करते है और क्योंकि वह सर्वव्यापी है, हर वस्तु में समाया है, अत: आपको सारी सृष्टि से प्रेम करना चाहिए। पर आप मोह न करो। जैसे आप बगीचे में जाते हो, फूलों की सुंदरता और झाड़ियों की हरियाली का आनंद उठाते हो, पर फूलों को नहीं तोड़ते या पौधों को नहीं उखाड़ते, नहीं तो माली आपकी खबर ले लेगा। आप अपनी इच्छाओं या अनुमानों के अनुसार नतीजे नहीं पा सकते। अत: अच्छे से अच्छा करने की कोशिश करो और नतीजे सत्गुरु पर छोड़ दो और जो कुछ भी नतीजे हों, उन्हें खुशी-खुशी स्वीकार करो। वे सदा नामलेवा के फायदे के लिए होते हैं, क्योंकि सिर पर कार्यरत गुरु- सत्ता जानती है कि उसके बीमार बच्चे के लिए क्या सही है ।

रूहानियत में वैवाहिक जीवन की कोई मनाई नहीं है, बशर्ते यह धर्मग्रंथों के आदेशानुसार व्यतीत किया जाए।

आप अपने सांसारिक प्रवास के लिए एक ऐसे साथी की तलाश कर सकते हैं, जो आप जैसे विचार रखता हो और उच्चतर संसार के जीवन की खोज में हो। मेरी शुभकामनाएँ सदा आपके साथ हैं। आप जहाँ चाहें, वहाँ रहें, कहीं भी रहें और कुछ भी करें, जो आपकी आंतरिक उन्नति में सहायक हो ।

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### जबाबदारी

सुरेश ओबेरॉय : आपल्या कर्मांचा आपण स्वीकार करायला हवा.

शिवानीदीदी आपल्या मनात जे काही चालू आहे, त्याची संपूर्ण जबाबदारी आपण स्वतः घेतली पाहिजे. आता आपण तुमच्या खोलीत गेलो आणि काही गोष्टी त्यांच्या जागेवर नसतील तर त्यासाठी कोण जबाबदार असेल?

सुरेश ओबेरॉय : मी.

शिवानीदीदी त्याचप्रमाणे, आपल्या मनाच्या खोलीत दुसरा कोणीही येऊ शकत नाही किंवा काही करू शकत नाही. फक्त आपणच जबाबदार असतो.

चिरंतन प्रेमाकडे वाटचाल

सुरेश ओबेरॉय : मग आपण असा विचार का करतो की इतर आपल्या मनाला अस्वस्थ करतात ?

शिवानीदीदी : कारण, त्यांच्याकडून उत्तेजन मिळतं.

सुरेश ओबेरॉय : पण इतर लोक आपल्यावर रागवूनच आपल्या मनात प्रवेश करतात. शिवानीदीदी : इतर लोक आपल्याला काही बोलू शकतात, शारीरिक इजा करू शकतात किंवा आर्थिक पिळवणूक करू शकतात पण त्यांची शक्ती तिथेच संपते. ते आपल्या मनात प्रवेश करू शकत नाहीत. बाह्य जगात जे घडतं ते त्यांच्यामुळे असू शकतं पण त्या घटनेनंतर आपल्या मनात जे घडतं ती संपूर्णपणे आपली निर्मिती असते. आपल्याला आपल्या समजेमध्ये हा बदल करावा लागेल. भलेही कोणी आपला अपमान केला तरी आपण स्वतःला सांगायला हवं, त्याने माझा अपमान केला, पण दुःख मी निर्माण केलं.

सुरेश ओबेरॉय : मी शाळेत असताना एकदा माझ्या मित्राची तक्रार केली होती. तेव्हा मला असं सांगितलं गेलं की, काठ्या आणि दगड तुझी हाडं मोडू शकतात पण शब्द कधीच तुला इजा पोहोचवणार नाहीत.

शिवानीदीदी : आपण शब्द ऐकू शकतो; पण त्यानंतर आपण आपल्या मनात काय निर्माण

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

सासू : रोज तू टीव्ही बघत बसतेस. जरा घरातली कामे पण कर.

सून : आई, टीव्ही बघते म्हणजे शिकतेय.

सासू : काय शिकतेस? सून : सास भी कभी बहू थी मधून तुमचं मन कसं जिंकायचं ते.

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* भारतातील पहिले वृत्तपत्र कोणते?

– बेंगाल गॅझेट

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## आहारवेद – आरोग्य संवर्धन

सावधानता : कोबीला अनेक वेळा कीड लागलेली असते किंवा कीड लागू नये म्हणून जास्त प्रमाणात कीटकनाशकाचा वापर केलेला असतो. अशावेळी गरम पाण्याने कोबी दोन-तीन वेळा स्वच्छ धुऊन घ्यावा. तसेच कोबी निवडताना पोकळ गड्ड्यांपेक्षा कठीण, घट्ट गड्डा निवडावा. हा कठीण घट्ट गड्डा उत्कृष्ट प्रतीचा असतो. कोबी निवडताना रंगाने हिरवट, पिवळसर घ्यावा. अति पिवळा पडलेला कोबी आहारात वापरू नये.

### कोबी

टोमॅटो

लालबुंद दिसणारा टोमॅटो हा मनाला आल्हाददायक व शरीरासही आरोग्यदायक आहे. टोमॅटो ही फळभाजी संपूर्ण जगात आवडीने खाल्ली जाते. लालबुंद गोल गरगरीत, लंबगोल पाणीदार असे हे टोमॅटो सर्वांसाठीच उपयुक्त आहे. हिंदीमध्ये 'टमाटर', इंग्रजीमध्ये 'टोमॅटो', संस्कृतमध्ये 'रक्तफल', तर शास्त्रीय भाषेमध्ये 'सोलॅनम लायकोपरसिकम' (Solanum Lycopersicum) या नावाने ओळखली जाणारी ही वनस्पती 'सोलॅनसी' कुळातील आहे.

टोमॅटो हा मूळचा दक्षिण अमेरिकेतील आहे. नंतर तो मलेशिया, भारत, अमेरिका, आफ्रिका असा संपूर्ण जगामध्ये आला. संपूर्ण जगात बटाट्याखालोखाल जास्त पिकविले जाणारे टोमॅटो हे लोकप्रिय पीक आहे.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं– ८७९३४००४००




श्रीमद् भागवत कथा निरूपण सोहळ्याचे सहावे पुष्प गुंफताना ज्येष्ठ ब्रम्हचारी श्रीमान रेवतीनंदन दास. शेजारील छायाचित्रात भजनात तल्लीन झालेले भाविक.

# सत्संगात नसलेल्यांची स्थिती भरकटलेल्या पतंगासारखीच

### ज्येष्ठ ब्रम्हचारी श्रीमान रेवतीनंदन दास यांचे प्रतिपादन

नगर – सत्संगात रहाणारे सत्कार्यच करतात. सत्संगात नसलेल्यांची स्थिती भरकटलेल्या पतंगासारखीच असते, असे प्रतिपादन ज्येष्ठ ब्रम्हचारी श्रीमान रेवतीनंदन दास यांनी केले.

येथील नवीन टिळक रोडवरील माऊली सांस्कृतिक भवनमध्ये आयोजित करण्यात आलेल्या श्रीमद् भागवत कथा निरूपण सोहळ्याचे सहावे पुष्प गुंफताना ते बोलत होते. यावेळी इस्कॉन मंदिराचे व्यवस्थापक गिरीवरधारी दास, वैष्णवतोष्णी दास, डॉ.सतीश फाटके, अशोक कानडे, मदन कांबळे, डॉ.सौ.अंजली फाटके, सौ. वंदना कानडे, मदनभाई पटेल, मिलिंद चवंडके, बाली जोशी, राजूभाई पटेल, डॉ.विजय भंडारी, मदन थोरात यांच्यासह स्त्री–पुरूष भाविक उपस्थित होते. महिलांची उपस्थिती लक्षणीय होती.

श्रीमान रेवतीनंदन दास पुढे म्हणाले, जीवन मनमानी पद्धतीने घालवतात त्यांना सद् गती मिळत नाही. जीवन सार्थकी होण्यासाठी आपल्या पिढीजात परंपरा श्रध्देने जतन कराव्या. संतांचा सत्संग आणि गुरूचे सानिध्य मिळवावे. गुरू आपल्या सानिध्यातील कोणालाही कधीही भरकटू देत नाहीत. गुरू वैयक्तिक मार्गदर्शन करत उध्दाराचा मार्ग दाखवतात.

सत्संग आसक्ती घालवतो. निरंतर भगवंत कथांचे श्रवण करताना गुरूंची वाणी हृदयात धारण करावी. गुरू प्रसन्न झाले की, भगवान प्रसन्न होतात. भगवंताचे नित्य गुणगान करावे. इंद्रिय निग्रह हा सदाचाराचा आधार होय. भेदभाव न करता समभाव असावा. दुसऱ्यांचे दोष पाहू नये. अहंकार आणि मीपणा सोडून द्यावा. आपले मन आनंदी ठेवावे. भगवंतावर विश्वास ठेवावा.

आपण धन कमावून, दान करून, पद मिळवून, प्रतिष्ठा प्राप्त करून, सौंदर्य सांभाळून भगवंताजवळ जाऊ शकत नाही तर भक्तीनेच भगवंताला आपलेसे करू शकतो. आपल्या देवघरातील देवांना दररोज नैवेद्य दाखवून तो प्रसाद म्हणून खाल्याने बुध्दी शुद्ध होते. भगवंताच्या प्रसादाने जीवनातील अशुद्धी, अपवित्रता, पाप नाहिसे होते. आपली भक्ती लोणचे आणि गुलाबजाम सारखी मुरली पाहिजे. भक्ती धावपळीचे कार्य नाही. सत्संगाने भक्ती वृध्दिंगत होऊन भगवंताची भेट घडवते, असे श्रीमान रेवतीनंदन दास यांनी सांगितले.

# प्रेरणादायी अक्षरधन

## क्रियेविण वाचाळता




पुष्कळ लोक पुष्कळ बोलतात. वाटतं, हे बोलण्यासाठीच जन्माला येतात. लहानपणी आईवडिलांची बोलणी खातात, तरी बोलणे कुठे सोडतात? पंडित नेहरू पंतप्रधान होते तेव्हा व्ही.के. कृष्णमेनन परराष्ट्र खाते सांभाळीत. तेही खूप बोलत. संयुक्त राष्ट्रसंघाच्या सभेत ते सतत तेरा तास बोलले. ते बोलायला थकले नाहीत, पण ऐकणारेच थकले. मेनन बोलण्याचा विक्रम नोंदवून गेले. एका सुभाषितात म्हटलंय,

मूर्ख एकत्र आले की, एकाच वेळी सगळे बोलायला लागले. शहाण्याने मात्र त्यावेळी मौन धरले. कावळे एकत्र आले. कलकलाट करू लागले. त्यात कोकिळेने का आपले सुस्वर पंचम सूर आवरले ? या कलकलाटात आपला सूर वाया जाणार हे तिला समजले. कावळ्यांनी तरी सतत कलकलाट करून काय साधले? कुणाला कुणाचे कळले? उगाच कंठशोष केले. अखेर बसले.

एक गोष्ट आहे. न्यायाधीशांपुढे एक खुनाचा खटला सुरू झाला. सरकारी वकिलाने एक साक्षीदार उभा केला. आरोपीवर खुनाचा आरोप सिद्ध व्हायला तो साक्षीदार महत्त्वाच ठरेल, असे दिसू लागले. कारण ज्याचा खून झाला, त्याच्या पत्नीकडे हा साक्षीदार खून झाल्याच्या काही क्षणातच पोहोचला होता. तसे त्या साक्षीदाराने कबूलही केले होते. त्यामुळे सरकारी वकील तासभर तेच ते रसभरीत वर्णन करून सांगू लागला. शेवटी म्हणाला, हा साक्षीदार खून झाल्यानंतरच्या काही क्षणांतच त्या मृताच्या पत्नीशी काही बोलायला गेला होता. तेव्हा हे साक्षीदारा, तू सांग, त्याच्या पत्नीने काय सांगितले ?

आरोपीच्या वकिलाने त्यावर आक्षेप घेतले. एक तास भाषण दिले. ही साक्ष रद्द करावी म्हणून ठासून सांगितले. पण सरकारी वकील पुन्हा एक तास बोलले आणि आरोपीचे मृताच्या पत्नीशी झालेले संभाषण आरोप सिद्ध करायला अत्यंत उपयुक्त आहे, त्याची दखल घ्यावी. असे सांगितले. न्यायमूर्तींना हे पटले. त्यांनी परवानगी दिली. दोन तास दोन वकील बडबडत होते. साक्षीदार मध्ये मध्ये बोलायचा प्रयत्न करायचा. पण त्याला बोलूच देत नव्हते.

आता न्यायमूर्तींनीच त्याला बोलायची परवानगी दिली. साक्षीदार म्हणाला, अहो, मी तिला भेटायला गेलो, पण ती घरीच नव्हती.

**– किशोर गांधी**

संकलन: दिशान फिचर्स

# सर्वसामान्यांना परवडणाऱ्या दर्जेदार आरोग्यसेवा देणे काळाची गरज

### सभापती राम शिंदे यांचे प्रतिपादन; हार्टबिट्स हॉस्पिटलच्या अद्ययावत सिटी स्कॅन प्रणालीचे उद्‌घाटन



हार्टबिट्स सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल व ग्लोबल डायग्नोस्टिकच्या अद्ययावत सिटीस्कॅन प्रणालीचे उद्‌घाटन करताना विधान परिषदेचे सभापती राम शिंदे. समवेत डॉ.चंद्रकांत कदम व आयुर्वेद तज्ज्ञ डॉ.संगीता कदम, मिलिंद गंधे, सचिन पारखी व डॉक्टर.

नगर – सध्याच्या महागाईच्या काळात सर्वसामान्य नागरिकांना परवडतील अशा दर्जेदार व आधुनिक आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणे ही काळाची गरज आहे. ग्रामीण व शहरी भागातील रुग्णांना एकाच छताखाली सर्व वैद्यकीय उपचार उपलब्ध होणे गरजेचे आहे. नव्याने सुरु झालेल्या हार्टबिट्स हॉस्पिटलने जिल्ह्यातील वैद्यकीय क्षेत्रात अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून अनुभवी वैद्यकीय तज्ज्ञांच्या माध्यमातून रुग्णसेवेचा दर्जा उंचावला आहे. यामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळेल, असे प्रतिपादन प्रतिपादन विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी केले.


सभापती राम शिंदे यांच्या हस्ते शहरातील सावेडी भागात नव्याने सुरु झालेल्या हार्टबिट्स सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल व ग्लोबल डायग्नोस्टिकच्या अद्ययावत सिटीस्कॅन प्रणालीचे उद्धाटन नुकतेच झाले.

यावेळी हॉस्पिटलचे संचालक डॉ. चंद्रकांत कदम व आयुर्वेद तज्ज्ञ डॉ.संगीता कदम, भाजपचे माजी शहराध्यक्ष मिलिंद गंधे, माजी सरचिटणीस सचिन पारखी, डॉ. गिरीश वाट, डॉ.सागर चौधरी, डॉ. विराज उत्पात यांच्यासह हॉस्पिटल व ग्लोबल डायग्नोस्टिकचे कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी सभापती राम शिंदे यांनी हॉस्पिटल– मधील विविध विभागांची पाहणी केली. तसेच अद्ययावत व सुसज्ज आयुर्वेद उपचार विभाग पाहून समाधान व्यक्त करून त्यांनी हॉस्पिटलच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

प्रास्ताविकात डॉ.चंद्रकांत कदम म्हणाले, शहरात नव्याने सुरु झालेल्या हार्टबिट्स सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये प्रत्येक रुग्णाच्या आजाराचे योग्य निदान करून योग्य उपचार करण्यासाठी अनुभवी तज्ज्ञ उपलब्ध आहेत. रुग्णकेंद्रित दर्जेदार उपचार सेवा, अत्याधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञान युक्त परवडणारे उपचार यांचा समन्वय साधत हार्टबिट्स हॉस्पिटल आरोग्यसेवेचे मंदिर आहे.

# अमळनेरकर महाराज सेवा समितीच्या वतीने अधिक मास निमित्त नगरमध्ये ३ ते ५ जूनपर्यंत ‘नऊकुंडी श्री विष्णुयाग’ कीर्तन सोहळा



नगर – श्री संत सद्गुरु सखाराम महाराजांच्या आशीर्वादाने व प्रसाद महाराजांच्या प्रेरणा मार्गदर्शन व उपस्थितीमध्ये ३ ते ५ जून रोजी पुरुषोत्तम (अधिक) मास निमित्त बंधन लॉन्स, सावेडी, अहिल्यानगर येथे अमळनेरकर महाराज सेवा समितीच्या वतीने कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्याची तयारी पूर्ण झाली असून उद्यापासून प्रामुख्याने ३, ४ व ५ जून रोजी नऊ कुंडी श्री विष्णू याग, सामवेद व शुक्ल यजुर्वेद पारायण, श्री संत सद्गुरु सखाराम महाराज महाराज जीवन चरित्र व समाजसेवा या विषयावर आधारित ह.भ.प. महेश जोशी महाराजांचे प्रवचन तसेच ३ व ४ जूनला शिष्य मंडळींकडून गुरूवर्य प्रसाद महाराजांच्या तुला देखील करण्यात येणार आहेत, ३ जून रोजी ह.भ.प. प्रकाश नंदगिरी महाराज देवगड संस्थान व ४ जून रोजी विद्याभूषण गुरुवर्य ह.भ.प. मुकुंद काका जाटदेवळेकर महाराज यांचा संत पूजनाचा कार्यक्रम होणार आहे. ३ जून रोजी रात्री ह. भ. प. ऋषिकेश महाराज यांचे सत्संग कीर्तन होईल व ४ जून रोजी रात्री ह. भ. प. राम महाराज झिंजुर्गे यांचे सत्संग कीर्तन होणार आहे. त्याचबरोबर ५ जून रोजी ह. भ. प. गुरुराज महाराज देगलूरकर यांचे सकाळी काल्याचे किर्तन आयोजित केलेले आहे. त्याच वेळी गुरुवर्य प्रसाद महाराज हे आपणां सर्वांना अधिक मासातील धार्मिक विधींचे महत्त्व या विषयीच्या संबोधनातून आशीर्वचन देणार आहेत. या सर्व धार्मिक कार्यक्रमाबरोबरच ३ जूनला स्वस्तिक हौस्पिटलच्या सहकार्याने आपण मोफत नेत्ररोग तपासणी शिबिराचे आयोजन केले आहे, या शिबिरात नगर जिल्ह्यातील नेत्र विकार तज्ञ डॉ. प्रफुल चौधरी हे नेत्र तपासणी करणार आहेत व ४ जून रोजी आपण जन कल्याण रक्तपेढी, अहिल्यानगरच्या सहकार्याने रक्तदान शिबीर आयोजित केलेले आहे, व या वेळी साधारण पणे २०१ रक्तदात्यांकडुन उस्फुर्तपणे रक्तदान नक्की व्हावे अशा स्वरुपाचा संकल्प यावेळी समितीने केलेला आहे, यानंतर सर्वांसाठी महाप्रसादाचे आयोजन केलेले आहे. या कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन अमळनेरकर महाराज सेवा समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

फोटो ओळी – अमळनेरकर महाराज सेवा समितीच्या वतीने अधिक मास निमित्त अहिल्यानगर येथे ३ ते ५ जून पर्यंत ’नऊकुंडी श्री विष्णुयाग’ कीर्तन, पारायण, प्रवचन यासह विविध धार्मिक सोहळ्याची तयारी पूर्ण झाली आहे

# सामान्य नागरिक, शेतकरी, छोटे व्यापारी आणि उद्योजकांना आर्थिक आधार देण्याचे काम ‘भिंगार अर्बन बँक’ करत आहे

### आमदार अक्षय कर्डिले यांचे प्रतिपादन; केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांना समाजाच्या वतीने विविध मागण्या संदर्भात निवेदन



भिंगार अर्बन को–ऑपरेटिव्ह बँकेच्या वतीने आमदार अक्षय शिवाजीराव कर्डिले यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी चेअरमन अनिलराव झोडगे, व्हा. चेअरमन किसनराव चौधरी आदींसह संचालक उपस्थित होते.

नगर – सहकार क्षेत्र हे महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचे बळ आहे. भिंगार अर्बन बँकेसारख्या संस्था सामान्य नागरिक, शेतकरी, छोटे व्यापारी आणि उद्योजकांना आर्थिक आधार देण्याचे महत्त्वाचे काम करत आहेत. ग्रामीण व शहरी भागातील आर्थिक व्यवहार अधिक सक्षम करण्यासाठी सहकार संस्थांनी आधुनिक तंत्रज्ञान स्वीकारत लोकाभिमुख भूमिका कायम ठेवली पाहिजे. जनतेच्या अपेक्षा पूर्ण करताना पारदर्शकता, विकास आणि सर्वसमावेशक दृष्टिकोन यांना प्राधान्य देण्याचा माझा प्रयत्न राहील, असे यावेळी बोलताना आमदार अक्षय कर्डिले म्हणाले.

पुढे ते म्हणाले, मतदारसंघातील जनतेने माझ्यावर दाखविलेला विश्वास ही केवळ निवडणुकीतील विजयाची बाब नसून ती माझ्यासाठी मोठी जबाबदारी आहे. ग्रामीण भागातील रस्ते, पिण्याच्या पाण्याच्या योजना, शिक्षण, आरोग्य सुविधा, युवकांसाठी रोजगारनिर्मिती आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांना प्राधान्य देत विकासकामांना गती देण्यासाठी मी सातत्याने प्रयत्नशील राहणार आहे. विकासाचा लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचला पाहिजे, हा माझा ठाम विश्वास आहे.

भिंगार अर्बन को–ऑपरेटिव्ह बँकेच्या वतीने आम दार अक्षय शिवाजीराव कर्डिले यांचा सत्कार समारंभ पार पडला. यावेळी आमदार कर्डिले यांचे शाल, श्रीफळ, पुष्पहार व सन्मानचिन्ह देऊन स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बँकेचे चेअरमन अनिलराव झोडगे होते. प्रारंभी दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर उपस्थितांच्या हस्ते आमदार कर्डिले यांचा सत्कार करण्यात आला.

त्यांनी पुढे सांगितले की, आज युवकांमध्ये मोठी क्षमता आहे. योग्य मार्गदर्शन, शिक्षण आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्यास तरुणाई राज्याच्या प्रगतीम ध्ये महत्त्वपूर्ण योगदान देऊ शकते. मतदारसंघातील युवक, महिला, शेतकरी आणि व्यावसायिक यांच्यासाठी विविध विकासात्मक योजना आणण्याचा मानस असून शासनाच्या विविध योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न केले जातील.

चेअरमन अनिलराव झोडगे म्हणाले की, अक्षय कर्डिले हे तरुण, अभ्यासू, शांत आणि विकासाभिमुख नेतृत्व आहे. त्यांनी अल्पावधीत जनतेच्या मनात विश्वास निर्माण केला आहे. मतदारसंघाच्या विकासासाठी ते निश्चितच प्रभावीपणे काम करतील, असा आम्हाला विश्वास आहे. त्यांच्या नेतृत्वातून परिसरातील पायाभूत सुविधा, शिक्षण, उद्योग आणि रोजगार क्षेत्रात सकारात्मक बदल घडतील. पुढे ते म्हणाले, भिंगार अर्बन बँक ही केवळ आर्थिक संस्था नसून सामाजिक बांधिलकी जपणारी सहकार चळवळीतील महत्त्वाची संस्था आहे. ग्राहकांचा विश्वास, पारदर्शक कारभार आणि सामाजिक उत्तरदायित्व या तत्त्वांवर बँकेची वाटचाल सुरू आहे. सर्वसामान्य नागरिकांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी बँक सातत्याने विविध योजना राबवत आहे. आमदार अक्षय कर्डिले यांच्या माध्यमातून परिसरातील विकासकामांना चालना मिळेल आणि सहकार क्षेत्रालाही बळकटी मिळेल, अशी अपेक्षा आहे. या प्रसंगी व्हाईस चेअरमन किसनराव चौधरी, संचालक राजेंद्र पतके, कैलासराव खरपुडे, विष्णू फुलसौदर, महेश झोडगे, माधव गोंधळे, रुपेश भंडारी, कैलास रासकर, कैलास दळवी, एकनाथराव जाधव, नामदेवराव लंगोटे, श्रीमती तिलोत्तमा करांडे, सौ. अनिता भुजबळ, रामसुख मंत्री (तज्ञ संचालक), राजेंद्र बोरा (उ.अ.) (तज्ञ संचालक) तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी शशीकांत महाजन उपस्थित होते. मुख्य कार्यकारी अधिकारी शशीकांत महाजन यांनी सूत्रसंचालन केले. विष्णू फुलसोंदर यांनी प्रास्तविक केले. व्हा. चेअरमन किसनराव चौधरी यांनी आभार मानले.



पेशवाई श्रीमंतच्या ‘लकी ड्रॉ’ ची सोडत आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते पार पडली.

# नगरमधील पेशवाई श्रीमंतच्या ‘लकी ड्रॉ’ मध्ये भाग्य खुललं !

### ग्राहकाला मिळाली टू–व्हीलर; १११ विजेत्यांना बक्षिसांचा वर्षाव

नगर – अहिल्यानगर शहरातील सर्जेपुरा परिसरातील वस्त्रदालन पेशवाई श्रीमंतच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या लकी ड्रॉ सोहळ्यात ग्राहकांवर बक्षिसांची बरसात झाली. मागील चार महिन्यांपासून खरेदी करणाऱ्या ग्राहकांसाठी ही विशेष स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

या लकी ड्रॉमध्ये टू–व्हीलर, कपल टूर, वॉशिंग मशीन, फ्रिज यांसारखी आकर्षक बक्षिसे ठेवण्यात आली होती. २९ मे रोजी आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते लकी ड्रॉ ची सोडत पार पडली. याप्रसंगी आमदार संग्राम जगताप यांनी या उपक्रमाचे कौतुक केले

यावेळी पेशवाई श्रीमंतचे संचालक राहुल येमूल उपस्थित होते. या सोहळ्यात किरण मोरे यांनी पहिलं बक्षीस म्हणून टू–व्हीलर जिंकत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. तसेच अशोक आंधळे यांना कपल टूर, सचिन पाटोळे यांना वॉशिंग मशीन मिळाले. याशिवाय एकूण १११ भाग्यवान विजेत्यांना विविध आकर्षक बक्षिसांचे वितरण करण्यात आले.

कार्यक्रमाला उपमहापौर धनंजय जाधव, सहाय्यक कामगार आयुक्त आर. एम. भिसले, उद्योजक महेंद्र बीझा, नगरसेवक मनोज दुल्लम, नगरसेवक सागर मुर्तडकर, नवनागपूर ग्रामपंचायत समिती सदस्य सागर सप्रे, मनोज लोंढे उपस्थित होत. ग्राहकांच्या विश्वासामुळेच पेशवाई श्रीमंतला मोठं यश मिळत असल्याची भावना यावेळी संचालक राहुल येमूल यांनी व्यक्त केली.

# वृक्षारोपण–वृक्षसंवर्धन–वृक्षदिंडी या त्रिसुत्री अभियानाचा साईबन कृषी पर्यटन केंद्रात शुभारंभ

### उपमहापौर धनंजय जाधव यांच्या हस्ते उद्‌घाटन




डॉ. कांकरियांचे साईबन कृषी पर्यटन क्षेत्रामध्ये वृक्षारोपण–वृक्षसंवर्धन–वृक्षदिंडी या त्रिसुत्री अभियानाचा शुभारंभ अहिल्यानगर महापालिककेचे उपमहापौर धनंजय जाधव यांच्या हस्ते झाला. समवेत डॉ. सुधा कांकरिया आदी.

नगर – येथील डॉ. कांकरियांचे साईबन कृषी पर्यटन क्षेत्रामध्ये वृक्षारोपण–वृक्षसंवर्धन–वृक्षदिंडी या त्रिसुत्री अभियानाचा शुभारंभ अहिल्यानगर महापालिककेचे उपमहापौर धनंजय जाधव यांच्या हस्ते झाला अशी माहिती साईबनच्या संचालिका डॉ. सुधा कांकरिया यांनी दिली. अध्यक्षस्थानी डॉ. प्रकाश कांकरिया हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून ग्रीन सिटी मोहिम – ग्रीन आर्मी कमिटीचे हर्षल आगळे हे होते. समवेत रोटरी क्लब ऑफ अ.नगरचे अध्यक्ष सुभाष गर्जे, सचिव आदिनाथ ठोंबे, डॉ. दादासाहेब करंजुले, सुहास क्षीरसागर, सौ. नयना गर्जे, सौ. स्नेहल क्षीरसागर हे उपस्थित होते.

उपमहापौर धनंजय जाधव म्हणाले की, पर्यावरणाचे संतुलन राहण्यासाठी वृक्षारोपण करणे गरजेचे आहे. त्यासोबतच वृक्षांची जोपासना अर्थात वृक्षसंवर्धन व्हायला हवे. फक्त झाडे लावा नव्हे तर त्या सोबत झाडांना जगविणेही आवश्यक आहे. वृक्षदिंडीच्या माध्यमातुन बाल वयातच मुलांवर वृक्षसंस्कार होतात. त्यामुळे हा त्रिसुत्री कार्यक्रम राबवुन साईबन परिवार हा नगरच्या हिरव्या वैभवात भर घालत आहे. सांडपाण्यावर पडिक जमिनीचा विकास करून साईबन हे नंदनवन फुलविण्याचे श्रेय हे डॉ. सुधा व डॉ. प्रकाश कांकरिया या दाम्पतयाकडे जाते. साईबन मध्ये मोठया प्रमाणात शालेय सहली येतात त्यांच्यावर वृक्षसंस्कार करण्याचे मौलिक कार्य इथे होतांना दिसते. ही समाधानाची बाब आहे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील ग्रीन सिटी मोहिम–ग्रीन आर्मी कमिटी योजना जाहिर झाल्यानंतर पहिला फोन साईबन कडून आला व ते या अभियानामध्ये सहभागी झाले याचा आनंद वाटतो. हर्षल आगळे यांनी साईबनचे कौतुक करून अभियानाला शुभेच्छा दिल्या.

अध्यक्षीय भाषणात डॉ. प्रकाश कांकरिया म्हणाले की पर्यावरणाचे रक्षण करणे प्रत्येक भारतीयांची जबाबदारी आहे. साईबनमध्ये आम्ही हजारो झाडे लावली व ती जगवली आहे. साईबनला महाराष्ट्र शासनाचा वनश्री पुरस्कार प्राप्त झाला आहेत.

सदर प्रसंगी पाहुण्यांच्या हस्ते तुळशीच्या रोपाचे पुजन व दीपप्रज्वलन करून उद्धाटन करण्यात आले. वृक्षारोपण करण्यात आले. सुभाष गर्जे यांनी ‘वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे’ हे समर्पक गीत सादर करून रोटरी परिवाराच्या वतीने शुभेच्छा दिल्या.

साईबन मध्ये आलेले १५० विद्यार्थी तसेच साईबनचे अधिकारी, पदाधिकारी, कर्मचारी, रोटरी परिवार वृक्षदिंडीमध्ये सहभागी झाले. त्यात नौजवान भारत सभा अ.नगर संस्थेचे विद्यार्थी अग्रभागी होते. वृक्षदिंडीचे उद्धाटन १० वर्षांची चि. शुरा क्षीरसागर हिच्या हस्ते करण्यात आले. पुढे वृक्षपालखी व त्यामागे विद्यार्थी हातामध्ये पर्यावरण संवर्धनाचे फलक घेऊन वृक्षदिंडी मध्ये दिमाखाने चालत होते. झाडे लावा, झाडे जगवा, पेड लगाओ–देश बचाओ, पर्यावरणाचे संवर्धन करूया, देशाला समृध्द करू या घोषणाने साईबनचा परिसर दुमदुमला गेला होता. वृक्षदिंडीची सांगता वृक्ष प्रतिज्ञेने झाली. साईबनच्या संचालिका डॉ. सुधा कांकरिया यांनी ‘मी वृक्षतोड करणार नाही, करू देणार नाही, मी एक तरी झाड लावेल व त्याला जगवेल’ अशी प्रतिज्ञा उपस्थितांकडून करून घेतली.

रोटरीचे सचिव आदिनाथ ठोंबे यांनी आभार मानले. सदर प्रसंगी नौजवान भारत सभा अ.नगर चे अतुल महारनवर, अविनाश साठे यांचा सत्कार करण्यात आला.



# मस्त पोटॅटो पास्ता

**झटपट रेसिपी**

दोस्तांनो, तुम्हाला पास्ता आवडतो का? मग ही हंगेरियन डिश तुमच्यासाठी आहे. अगदी कमी घटकांचा वापर करून तुम्ही ही डिश बनवू शकता.

**सामग्री:** फ्लॅट पास्ता, २ बटाटे, एक चिरलेला कांदा, मिरपूड, लाल पॅपरिका, चवीनुसार मीठ आणि तेल.

**कृती:** पास्ता पाण्यात शिजवून घ्या. पास्ता शिजवण्याची कृती पाकिटावर दिलेली असते. बटाट्याची सालं काढून त्यांचे छोटे तुकडे करा. एका भांड्यात पाणी घ्या. गॅसवर ठेवा. पाणी उकळल्यावर त्यात बटाट्याचे तुकडे घाला. मऊ शिजू द्या. पाणी काढून टाका. आता हे बटाटे कुस्करून घ्या. कढईत थोड तेल घ्या. त्यात चिरलेला कांदा घालून दोन मिनिटं परता. आता यात कुस्करलेले बटाटे घाला. नीट हलवून घ्या. त्यात मिरपूड, मीठ आणि लाल पॅपरिका घाला. सर्व नीट शिजल्यावर कढईत पास्ता घाला. सगळं नीट मिक्स करा. गॅस बंद करा आणि गरमागरम पोटॅटो पास्ता खा.




# आता घडवतो इतरांचे भविष्य

**अचिव्हर**

भारतात शिक्षणाला आजही परिवर्तनाचे सर्वांत मोठे साधन मानले जाते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी म्हटले होते, शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे; जो पिईल तो गर्जना केल्याशिवाय राहणार नाही. या वाक्यामागे केवळ प्रेरणा नव्हती, तर सामाजिक क्रांतीची दिशा दडलेली होती. कारण शिक्षण हे केवळ अक्षरओळख देत नाही, तर ते आत्मविश्वास, स्वाभिमान आणि आयुष्य बदलण्याची ताकद देते. आजही भारतातील लाखो गरीब कुटुंबांसाठी शिक्षण हे दारिद्र्याच्या चक्रातून बाहेर पडण्याचे सर्वांत प्रभावी साधन आहे; पण दुर्दैवाने अनेक मुलांना अजूनही गरिबीमुळे शिक्षणापासून दूर राहावे लागते. अशा परिस्थितीत एखादा तरुण स्वतःचे अपूर्ण राहिलेले स्वप्न बाजूला ठेवून शेकडो मुलांच्या भविष्याची जबाबदारी उचलतो तेव्हा ती केवळ प्रेरणादायी कथा राहत नाही, तर ती समाजाला दिशा देणारी चळवळ बनते.

२१ वर्षीय आदित्यची कथा ही संघर्ष, जिद्द आणि सामाजिक बांधिलकीची कहाणी आहे. स्वतःच्या आयुष्यात गरिबीमुळे शिक्षण अर्धवट सोडावे लागलेला हा तरुण आज शेकडो मुलांना मोफत शिक्षण देत आहे. एकेकाळी फी भरता आली नाही म्हणून त्याला शाळेबाहेर काढण्यात आले होते. तोच आज इतर मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात टिकवून ठेवण्यासाठी झटत आहे. यात केवळ वैयक्तिक यश नाही, तर शिक्षणाची खरी सामाजिक ताकद दडलेली आहे.

आदित्य सांगतो, सातवीत असताना फी न भरल्यामुळे त्याला शाळा सोडावी लागली. भारतात अशा घटना अजूनही असंख्य गरीब कुटुंबांमध्ये घडतात. शिक्षण मोफत असल्याचे सांगितले जाते; पण प्रत्यक्षात फी, वह्या, गणवेश, प्रवास आणि इतर खर्च अनेक कुटुंबांसाठी परवडणारे नसतात. परिणामी अनेक मुले शिक्षण अर्धवट सोडून मजुरी, छोटे-मोठे काम किंवा निरर्थक सवयींकडे वळतात. आदित्यने स्वतः ही वेदना अनुभवली होती. म्हणूनच तो आपल्या गावात मुलांना जुगार खेळताना पाहायचा तेव्हा त्याला त्यामध्ये स्वतःचे हरवलेले बालपण दिसायचे. त्याने त्या मुलांना फक्त 'खेळू नका' असे सांगितले नाही, तर 'चला, शिकायला या' असे आवाहन केले.

याच एका छोट्या प्रयत्नातून आज तीन शिक्षण केंद्रे उभी राहिली आहेत, जिथे जवळपास २३० मुले मोफत शिक्षण घेत आहेत. विशेष म्हणजे येथे केवळ पुस्तकी शिक्षण दिले जात नाही, तर व्यायाम, शिस्त आणि व्यक्तिमत्त्व विकासावरही भर दिला जातो. कारण शिक्षण ही चांगला नागरिक घडवण्याची प्रक्रिया आहे, ही जाणीव आदित्यच्या कामातून दिसते.

सर्वांत भावणारी गोष्ट म्हणजे आदित्यचे स्वप्न. तो केवळ कोचिंग सेंटर चालवू इच्छित नाही, तर भविष्यात नियमित शिक्षणासोबत कौशल्य विकासावरही भर दिला जाईल अशी शाळा उभारू इच्छितो. अनेकदा शिक्षण रोजगार, कौशल्य आणि वास्तव आयुष्यापासून तुटलेले असते हीच भारतातील शिक्षणव्यवस्थेची एक मोठी उणीव आहे. आदित्यला कदाचित मोठमोठे शैक्षणिक सिद्धांत माहित नसतील; पण शिक्षणाची खरी गरज काय आहे, याची त्याला प्रत्यक्ष जीवनातून आलेली जाणीव आहे.




## फंडू एसएमएस

| | | |
|---|---|---|
| धडकने लगे दिल की तारों की<br>दुनिया जब तुम मुस्कुरा दो,<br>संवर जाए हम बेकरारों की<br>दुनिया जब तुम मुस्कुरा दो। | उनकी चाहत में हम<br>कुछ यूं बंधे हैं।<br>वो साथ भी नहीं,<br>हम अकेले भी नहीं। | खामोश सा शहर और<br>गुफ्तगू की आरजू,<br>हम किससे करे बात<br>कोई बोलता ही नहीं। |

**टेक्नो टॉक**

## नवीन फोन घेतल्यानंतर प्रथम 'हे' करा!



नवीन स्मार्टफोन हातात आल्यावर होणारा आनंद काही वेगळाच असतो; मात्र फोनचा बॉक्स उघडल्यानंतर केवळ सिम कार्ड टाकून तो वापरणे पुरेसे नसते. फोनची सुरक्षा, बॅटरीचे आयुष्य आणि पर्सनल डेटा सुरक्षित ठेवण्यासाठी काही महत्त्वाच्या सेटिंग्ज करणे अनिवार्य आहे. या गोष्टींकडे दुर्लक्ष केले, तर भविष्यात आर्थिक नुकसान होऊ शकते किंवा महत्त्वाचा डेटा चोरीला जाऊ शकतो. म्हणूनच नवीन फोन घेतल्यावर 'या' ५ महत्त्वाच्या सेटिंग्ज नेमक्या कशा कराव्यात जाणून घ्या

**गुगल किंवा ॲपल आयडी सेटअप आणि बॅकअप**

नवीन फोन सुरू करताना सर्वांत पहिली पायरी म्हणजे तुमचा अधिकृत गूगल किंवा ॲपल आयडी लॉगिन करणे. यामुळे तुमच्या फोनमधील कॉन्टॅक्ट नंबर, फोटो आणि महत्त्वाच्या फाईल्स क्लाउडवर सुरक्षित राहतात. फोन सेटअप करतानाच ऑटो बॅकअपचा पर्याय निवडा जेणेकरून फोन हरवला किंवा खराब झाला तरी तुमचा डेटा सुरक्षित राहील. तसेच डूपल सेटिंग सुरू ठेवल्याने तुमच्या जुन्या फोनमधील डेटा नवीन फोनमध्ये सहज ट्रान्सफर होतो.

**फाईंड माय डिव्हाईस सेटिंग**

महागडा फोन हरवला किंवा चोरीला गेला तर तो शोधण्यासाठी फाईंड माय डिव्हाईस (अँड्रॉइडसाठी) किंवा फाईंड माय आयफोन (आयओएससाठी) ही सेटिंग अत्यंत महत्त्वाची आहे. फोनच्या सिक्युरिटी सेटिंगमध्ये जाऊन हा पर्याय लगेच ऑन करा. यामुळे तुम्ही दुसऱ्या उपकरणावरून तुमच्या फोनचे लोकेशन ट्रॅक करू शकता फोन लॉक करू शकता किंवा त्यातील डेटा रिमोटली डिलीट करू शकता. ही एक छोटी सेटिंग फोनला चोरीपासून वाचवू शकते.

**बायोमेट्रिक आणि स्क्रीन लॉक सुरक्षा**

सुरक्षेच्या दृष्टीने फोनला केवळ पॅटर्न किंवा पिन लॉक ठेवणे पुरेसे नाही. आजकालच्या फोनमध्ये फिंगरप्रिंट स्कॅनर आणि फेस अनलॉक यांसारखी प्रगत फीचर्स असतात. फोन सेट करतानाच या दोन्ही सेटिंग्स नीट कॉन्फिगर करा. यामुळे तुमच्या परवानगीशिवाय कोणीही तुमचा फोन उघडू शकणार नाही. विशेषतः बँकिंग ॲप्स आणि पर्सनल चॅट्स सुरक्षित ठेवण्यासाठी बायोमेट्रिक लॉक हा सर्वांत भक्कम पर्याय आहे.

**नको असलेले ॲप्स आणि नोटिफिकेशन्स बंद करा**

अनेकदा नवीन फोनमध्ये कंपन्या आधीच काही अनावश्यक ॲप्स देऊन ठेवतात. हे ॲप्स बॅकग्राउंडला सुरू राहून तुमची बॅटरी आणि डेटा खर्च करतात. त्यामुळे फोन सुरू केल्यावर अनावश्यक ॲप्स अनइन्स्टॉल किंवा डिसेबल करा. तसेच प्रत्येक ॲपची नोटिफिकेशन्स सुरू ठेवल्याने फोनचा डिस्प्ले वारंवार चालू होतो. त्यामुळे बॅटरी लवकर संपते. केवळ महत्त्वाच्या ॲप्सचीच नोटिफिकेशन्स सुरू ठेवावीत.

**सॉफ्टवेअर आणि सिस्टिम अपडेट तपासा**

नवीन फोन बॉक्समधून काढला असला तरी तो कंपनीकडून स्टोअरमध्ये येईपर्यंत काही काळ उलटलेला असतो. या दरम्यान कंपनीने सुरक्षेसाठी काही नवीन सिक्युरिटी पॅचेस किंवा सॉफ्टवेअर अपडेट्स रिलीज केलेले असू शकतात. फोन सुरू केल्यावर सेटिंग्जमध्ये जाऊन सॉफ्टवेअर अपडेट तपासा आणि फोन अपडेट करून घ्या. यामुळे फोनमधील बग्ज दूर होतात आणि फोनची परफॉर्मन्स अधिक चांगला होतो.

# बारावी नापास झालात?

**करियर ऑप्शन्स**

बारावी नापास झालात म्हणून निराश होऊ नका. जास्त टेन्शन घेण्याची गरज नाही. अपयश ही यशाची पहिली पायरी असते. कारण त्यातूनच आपण काहीतरी शिकतो. अपयश प्रत्येकाला कधी ना कधी, कुठे ना कुठे आले आहे. कोणाला नापास होऊन तर कोणाला कमी गुणांनी; पण नापास झाला असाल तर लगेच हिंमत हरू नका. बारावी नापास झाल्यावर अनेक कोर्सेस उपलब्ध आहेत. या कोर्समध्ये प्रवेश घेऊन चांगले करियर बनू शकते. ■ बारावीत नापास झाल्यावर हे कोर्स करता येतात आयटीआय डिप्लोमा कोर्सेसः बारावीमध्ये नापास झाला असाल तर तांत्रिक क्षेत्रात करियर करता येईल. त्यासाठी आयटीआय डिप्लोमा कोर्स करणे हा उत्तम पर्याय आहे. सरकारने प्रत्येक शहरात आणि गावात आयटीआय केंद्रे उघडली आहेत. सहा वर्षांचा किंवा दोन वर्षांचा डिप्लोमा कोर्स करू शकता. ■ कॉम्पुटर डिप्लोमा कोर्सेसः बारावीमध्ये नापास झाल्यानंतर या कोर्सेसना प्रवेश घेता येईल. त्यात तुम्ही कॉम्पुटर, हार्डवेअर, नेटवर्किंग, मोबाईल, एचटीएमएल, व्हिडीओ एडिटिंग, ड्रीमव्ह्यूव्हर आणि कॉम्प्यूटर या ॲप्लिकेशन विषयांचा अभ्यास शकू शकता. ■ ॲनिमेशनमधील डिप्लोमा कोर्सेसः 'ॲनिमेशन'च्या सतत वाढत्या वापरामुळे या क्षेत्रातील व्यावसायिकांची मोठी मागणी केली जात आहे. ॲनिमेशन कोर्स करिअरची हमी म्हणून पाहिला जात आहे. चित्रपट, खेळ आणि जाहिराती यासारख्या क्षेत्रात ॲनिमेशनचा बराच वापर केला जातो. 'ॲनिमेशन'च्या अनेक डिप्लोमा कोर्समध्ये दहावी उत्तीर्ण झाल्यानंतर प्रवेश घेऊ शकता.





# अभ्यास करताना या ट्रिक्स वापरा

**स्टडी टिप्स**

अनेकदा विद्यार्थी अभ्यास करायला अजिबात आवडत नाही, अशी तक्रार करतात. ते अभ्यास करायला बसतात तेव्हा त्यांचं लक्ष लवकर विचलित होतं आणि ते अभ्यास करू शकत नाहीत. ही समस्या जवळजवळ प्रत्येक विद्यार्थ्याला जाणवते. ही समस्या केवळ अभ्यासावरच परिणाम करते असं नाही, तर विद्यार्थ्यांच्या भविष्यावरही परिणाम करू शकते. अर्थात त्यावरही उपाय आहे.

अभ्यासावर लक्ष केंद्रित करण्याचे अनेक मार्ग आहेत. त्यांचा अवलंब करून तुम्ही प्रभावीपणे अभ्यास करू शकता.

*** ध्यान करा**

अभ्यास सुरू करण्यापूर्वी ध्यान केल्यास मन अधिक एकाग्र होईल आणि अभ्यास करताना लक्ष विचलित होणार नाही. ध्यान मनाला शांत आणि स्थिर ठेवते त्यामुळे तुम्ही अधिक सहजपणे अभ्यास करू शकाल. ध्यान केल्याने स्मरणशक्तीदेखील सुधारते. त्यामुळे माहिती चांगल्या प्रकारे लक्षात ठेवता येते. परीक्षेदरम्यान मन सक्रीय आणि एकाग्र राहतं. त्यामुळे परीक्षेत चांगलं यश मिळतं.

*** अभ्यासातून ब्रेक घ्या.**

सतत अभ्यास केल्याने मन आणि डोळे थकू शकतात. म्हणून लहान ब्रेक घेणं महत्वाचं ठरतं. विश्रांतीदरम्यान, तुम्ही थोडं फिरायला जाणं, हलका नाश्ता करणं किंवा मनोरंजनाची साधनं वापरणं अशी कामं करू शकता. त्यामुळे तुमचं मन ताजंतवानं होईल आणि तुम्ही पुन्हा अभ्यासावर लक्ष केंद्रित करू शकाल.

*** नियोजन करा**

चांगली योजना बनवून अभ्यास प्रभावी आणि व्यवस्थित करता येतो. तुम्ही ध्येयांसाठी स्पष्ट योजना बनवता, तेव्हा तुम्हाला अधिक प्रेरणा आणि आत्मविश्वास मिळतो. अभ्यास केंद्रित आणि प्रभावी करण्यासाठी दीर्घकालीन ध्येयांसह दररोज एक छोटी योजना बनवली पाहिजे.


*** 'सोशल मीडिया'पासून अंतर ठेवा**

मोबाईल किंवा लॅपटॉप वापरून अभ्यास करत नसाल, तर त्यांना अभ्यासाच्या वेळी दूर ठेवा.

# हा व्यवहार ठरेल का?

**मॅच म**

ऑनलाईन डेटिंग ॲपवरून माझी एका सुंदर मुलीशी ओळख झाली. आम्ही चॅट करू लागलो. आमचे स्वभावही जुळत असल्याने मी हा संवाद पुढे सुरू ठेवला. आठवड्याभराने आम्ही एकमेकांना मोबाईल नंबर दिले. तिच्याशी फोनवर बोलायला मी खूपच उत्सुक आहे. तिच्या सौंदर्यावर मी भाळलो आहे. पण मला तिने मोठा धक्का दिला. फोनवर संवाद सुरू करण्याआधी खात्यात ५०० रुपये जमा कर, असा मेसेज तिने पाठवला. मला तिला जाणून घ्यायचं आहे. पण कोणी अशाप्रकारे पैसे कसे काय मागू शकतं? तिला पैसे पाठवणं हा मूर्खपणा ठरेल हे मी जाणतो. पण मला हे करावंसं वाटतंय. तिच्याशी बोलण्याची खूप इच्छा आहे. मी काय करू?



**उत्तर :** मित्रा, इथे तुझ्याकडे दोन पर्याय आहेत. एक म्हणजे ५०० रुपये देऊन तिच्याशी बोलणं सुरू करायचं किंवा पैसे न देण्याचा निर्णय घ्यायचा. पैसे दिले नाहीत तर ती तुझ्याशी बोलणार नाही. या नात्याकडे तू कशापद्धतीने बघतोस यावर पुढचा निर्णय अवलंबून आहे. या नात्याकडे तू गंमत म्हणून बघत आहेस का तुला याचं गांभीर्य आहे हे आधी ठरव. तसंच तिच्याशी बोलण्यासाठी तू किती पैसे देणार आहेस? भविष्यात ही रक्कम वाढूही शकते. सध्या तू तिच्या सौंदर्याकडे आकर्षित झाला आहेस. पण पुढे तू या नात्यात अधिक गुंतशील. या नात्यातल्या तुझ्या आणि तिच्या अपेक्षा जुळल्या तर तिला पैसे देऊन तू पुढे जाऊ शकतोस. पण यातल्या धोक्याची जाणीव झाली असेल तर वेळीच थांबणं योग्य ठरेल.

# निसर्गसौंदर्य आणि वास्तूकला

**भटकंती**



दक्षिण भारतातील तामिळनाडू हे राज्य केवळ प्राचीन मंदिरे, सांस्कृतिक वारसा आणि देदिप्यमान वास्तुकलेसाठीच प्रसिद्ध नाही, तर निसर्गसौंदर्याच्या अप्रतिम खजिन्यासाठीही ओळखले जाते. एका बाजूला मीनाक्षी अम्मन मंदिर, बृहदेश्वर मंदिर आणि रामेश्वरम मंदिर यांसारखी आध्यात्मिक स्थळे मनाला शांतता देतात; तर दुसऱ्या बाजूला नीलगिरी पर्वतरांगांमधील धुक्याने वेढलेली हिल स्टेशन पर्यटकांना स्वर्गीय अनुभव देतात.

उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये उकाड्यापासून दूर निसर्गाच्या सान्निध्यात काही क्षण घालवायचे असतील, तर तामिळनाडूतील हिल स्टेशन हा एक उत्तम पर्याय ठरू शकतो.

**ऊटी (हिल स्टेशनची राणी)**

ऊटीला 'क्वीन ऑफ हिल स्टेशन्स' असे म्हटले जाते आणि ते नाव अगदी सार्थ वाटते. नीलगिरी पर्वतरांगांमध्ये वसलेले हे ठिकाण म्हणजे निसर्ग, धुके आणि हिरवाई यांचे मोहक मिश्रण आहे. चहाच्या मळ्यांनी झाकलेले डोंगर, शांत तलाव, वळणदार रस्ते आणि थंडगार हवा यामुळे ऊटीला एक सिनेमॅटिक आकर्षण लाभले आहे. येथे अनेक हिंदी आणि दक्षिण भारतीय चित्रपटांचे चित्रीकरण झाले आहे. नीलगिरी माउंटन रेल्वेची टॉय ट्रेन सफर ही पर्यटकांसाठी विशेष आकर्षण असते. याशिवाय डोड्डाबेट्टा पीक, ऊटी बोटॅनिकल गार्डन आणि पायकारा धबधबा ही ठिकाणे निसर्गप्रेमींसाठी स्वर्गच वाटतात. एप्रिल ते जून हा ऊटीला भेट देण्यासाठी सर्वोत्तम काळ मानला जातो.

**कोडाईकॅनॉल (धुक्यात हरवलेले सौंदर्य)**

कोडाईकॅनॉल हे तामिळनाडूतील आणखी एक अत्यंत लोकप्रिय आणि मनमोहक हिल स्टेशन आहे. हिरव्यागार पर्वतरांगा, धबधबे, तलाव आणि धुक्याने वेढलेले वातावरण यामुळे या ठिकाणाला रोमँटिक आणि शांत अशी ओळख मिळाली आहे. येथे असलेले कोडाई लेक हे ताऱ्यासारख्या आकाराचे सुंदर तलाव पर्यटकांना विशेष आकर्षित करते. येथे बोटिंग, सायकलिंग आणि ट्रेकिंगसारख्या उपक्रमांचा आनंद घेता येतो.




# रेल्वेमध्ये नोकरीची संधी

**रोजगारवाटा**

रेल्वे भरती मंडळ देशभरातील १७ रेल्वे झोनमध्ये एकूण ११,१२७ पदांसाठी भरती करत आहे. रेल्वे मंत्रालयाने या भव्य भरतीला आधीच मंजुरी दिली आहे. रेल्वे भरती मंडळाने (आरआरबी) सहाय्यक लोको पायलट (एएलपी) भरती २०२६-२७ साठी एक संक्षिप्त अधिसूचना प्रसिद्ध केली आहे. एकूण ११,१२७ पदे भरली जाणार आहेत.

ऑनलाइन अर्ज १५ मे २०२६ रोजी सुरू झाले आहेत. अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत १४ जून २०२६ रोजी रात्री ११:५९ आहे. रेल्वे मंत्रालयाने १७ रेल्वे झोनमधील एकूण ११,१२७ लोको पायलट पदांच्या भरती प्रक्रियेला मंजुरी दिली आहे. सर्वाधिक पदे ईस्ट कोस्ट रेल्वे (१६२५), साऊथ ईस्टर्न रेल्वे (१५३१) आणि सेंट्रल रेल्वे (१४००) मध्ये आहेत. उमेदवार त्यांच्या झोननुसार अर्ज करू शकतात.

सहाय्यक लोको पायलट पदासाठी अर्ज करण्यासाठी, किमान दहावी उत्तीर्ण असणे आणि संबंधित ट्रेडमध्ये (फिटर, इलेक्ट्रीशियन, डिझेल मॅकॅनिक, इत्यादी) आयटीआय प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. अभियांत्रिकीमधील डिप्लोमा किंवा पदवी (बीई/बी.टेक) असलेले उमेदवारदेखील अर्ज करू शकतात. अर्जदारांचे वय १८ ते ३० वर्षांच्या दरम्यान असावे. शासकीय नियमांनुसार राखीव प्रवर्गांसाठी वयोमर्यादेत सवलत उपलब्ध आहे.


ही भरती अहमदाबाद, मुंबई, चेन्नई, कोलकाता आणि सिकंदराबाद यासारख्या इतर मंडळांसह, देशभरातील विविध रेल्वे झोन आणि आरआरबींसाठी आयोजित केली जाईल. उमेदवारांना अर्ज करण्यापूर्वी सविस्तर सीईएन क्रमांक ०१/२०२६ काळजीपूर्वक वाचण्याचा सल्ला दिला जातो. पहिली संगणक आधारित चाचणी (सीबीटी १) असेल. त्यानंतर दुसरी संगणक आधारित चाचणी (सीबीटी २) होईल. तिसरी संगणक आधारित अभियोग्यता चाचणी (सीबीटी ३) असेल. यानंतर कागदपत्रांची पडताळणी आणि वैद्यकीय चाचणी घेतली जाईल. उमेदवार आरआरबीॲप्लाय.जीओव्ही.इन या अधिकृत वेबसाइटद्वारे अर्ज करू शकतात.

# घामामुळे फॅट्स कमी होतात?

**फिटनेस फंडा**

खूप घाम आला की वजन कमी होतं, असा एक समज असतो. त्यामुळे बरेच जीम ट्रेनर्स उन्हाळ्यात भरपूर व्यायाम करण्याचा सल्ला देतात. हिवाळ्यात वजन वाढत असल्याचं अनेकांचं म्हणणं असतं. पण हे फक्त गैरसमज आहेत. फॅटलॉसची नेमकी प्रक्रिया काय हे आपण समजून घेऊ.

घामामुळे कॅलरी खर्च होत असतील तर हिवाळ्यात शरीरातली एकही कॅलरी खर्च होणार नाही. कारण थंडीत घाम येतच नाही. थंड प्रदेशात रहाणाऱ्यांची यामुळे चांगलीच पंचाइत होईल. घाम कसा गाळायचा असा प्रश्न त्यांना पडेल. लो कॅलरी डाएट घेतल्यानंतर कमी झालेल्या कॅलरींची भरपाई शरीर करतं. आवश्यक असलेली ऊर्जा मिळवण्यासाठी मग शरीर साठलेल्या चरबीचा वापर करतं. शरीरात कमी प्रमाणात कॅलरी गेल्या तर ऊर्जेसाठी साठवलेल्या फॅट्सचा वापर सुरू होतो आणि वजन कमी होतं. या प्रक्रियेशी ऋतूचा काहीच संबंध नसतो.



घामाच्या माध्यमातून चरबी जाळली जात नाही. शरीराचं तापमान नियंत्रित ठेवण्याचं एक माध्यम म्हणजे घाम. उन्हाळ्यात बाहेरचं तापमान जास्त असल्याने आपल्याला घामाच्या धारा लागतात. याचा व्यायामाशी काहीच संबंध नसतो. शरीर आतून थंड रहाण्याचा प्रयत्न करत असल्याने उन्हाळ्यात व्यायाम करताना थोडा जास्त घाम येतो. हिवाळ्यात शरीर आधीच थंड असतं. त्यामुळे घाम जास्त येत नाही.

मात्र घाम न येणं हे हिवाळ्यात वजन वाढण्याचं कारण ठरत नाही. हे सर्वस्वी आपल्या आहारावर अवलंबून असतं. या काळात जास्त कॅलरीयुक्त आहार घेतला तर वजन वाढतं. कॅलरी कमी ठेवल्या तर वजन नियंत्रित रहातं किंवा कमी होतं. फरक इतकाच की उन्हाळ्यात आपण जास्त पाणी पितो. तुम्ही खूप तीव्र स्वरूपाचा व्यायाम करत असाल तर शरीरातला ओलावा टिकवून ठेवण्यासाठी भरपूर पाणी प्यायला हवं.

# थकीत वेतन, पीबीआय व बदलीच्या मागण्यांसाठी समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांचे अन्नत्याग आंदोलन

### ऑनलाइन काम बंद; जिल्हा परिषद कार्यालयासमोर एकदिवसीय आंदोलन



नगर – राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी समुदाय आरोग्य अधिकारी संघटनेच्या वतीने जिल्हा परिषद कार्यालयासमोर एकदिवसीय अन्नत्याग आंदोलन करण्यात आले. यासोबतच समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांनी ऑनलाइन काम बंद आंदोलनही सुरू केले आहे.

संघटनेच्या वतीने तीन महिन्यांचे थकीत वेतन तातडीने अदा करावे, पाच महिन्यांपासून प्रलंबित असलेला कामावर आधारित मोबदला द्यावा, जिल्हा अंतर्गत बदल्या लवकरात लवकर पूर्ण कराव्यात तसेच कोविड काळातील फरकाची रक्कम त्वरित अदा करावी, अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत.

यावेळी जिल्हाध्यक्ष डॉ. शैलेश पवार, उपजिल्हाध्यक्ष सूर्यकांत यादव, सचिव अक्षय जवरे, डॉ. प्रीती सैदोरे, डॉ. नूतन कडलग, डॉ. शितल चौधरी, प्रवीण राठोड, डॉ. योगिता शेजाळ, डॉ. सविता कुटे, डॉ. वैष्णवी गोपालघरे, डॉ. दिनेश भोज, अक्षय अनाप, राम भवानी, विजय शिंदे, नाईकवाडे यांच्यासह पदाधिकारी व समुदाय आरोग्य अधिकारी उपस्थित होते.

संघटनेने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांचे डिसेंबर, जानेवारी, मार्च आणि एप्रिल महिन्यांचे कामावर आधारित मोबदला तसेच मार्च आणि एप्रिल महिन्यांचे मूलभूत मानधन अद्याप प्रलंबित आहे. शासनाकडून पगार वितरणासाठी निधी उपलब्ध होऊनही वेतन वितरणाबाबत राज्य शासनाकडून अपेक्षित कार्यवाही होत नसल्याचा आरोप संघटनेने केला आहे.

जिल्हा परिषद अहिल्यानगरकडून वेतन वितरणासंदर्भातील आवश्यक माहिती राज्य शासनाकडे पाठविण्यात आली असतानाही अद्याप वेतन अदा करण्यात आलेले नाही. परिणामी, गेल्या अनेक महिन्यांपासून वेतन न मिळाल्याने समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांवर आर्थिक संकट ओढवले असून उपकेंद्रापर्यंत जाण्याचा खर्च भागविणेही कठीण झाले आहे, अशी खंत आंदोलकांनी व्यक्त केली.

प्रत्येक कर्मचारी आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी काम करतो. मात्र वेळेवर मानधनच मिळत नसेल तर जगायचे कसे? असा सवाल उपस्थित करत संघटनेने शासनाने तातडीने मागण्यांची पूर्तता करावी, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही दिला आहे.

समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांवर तत्काळ निर्णय घेऊन थकीत वेतन, पीबीआय, कोविड काळातील फरकाची रक्कम आणि बदली प्रक्रिया पूर्ण करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

## शेतजमीन परत करण्यासाठी महिलेला धमकी; गुन्हा दाखल

नगर – खरेदी केलेली शेतजमीन परत देण्यासाठी एका महिलेला फोनवरून जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. एवढेच नव्हे तर संशयित आरोपीने पीडित महिलेच्या शेतातील खोलीत बेकायदेशीरपणे प्रवेश करून ती खोली आग लावून पेटवून दिली. या आगीत खोलीतील महत्त्वाचे दस्तऐवज, कागदपत्रे आणि इतर साहित्य जळून खाक झाले असून मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. नगर तालुक्यातील निंबळक शिवारात हि घटना घडली.या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत प्रिया गिरीश भुंजे (वय ५१, मूळ रा.पुणे, हल्ली रा. गुजरात) यांनी फिर्याद दिली आहे. पीडित महिलेने निंबळक शिवारातील गट क्रमांक ४८७/अ मधील शेतजमीन खरेदी केली होती. हीच जमीन पुन्हा परत मिळावी म्हणून संशयित आरोपी सचिन बबन बारस्कर (रा. आहिल्यानगर) हा ऑगस्ट २०२५ ते २६ मे २०२६ या कालावधीत पीडित महिलेला सतत फोन करून धमकावत होता. जमीन परत न केल्यास गंभीर परिणाम भोगण्याची धमकी त्याने दिली होती. यानंतर संशयिताने थेट शेतातील खोलीत घुसून जाणीवपूर्वक आग लावली. या घटनेची माहिती मिळताच एमआयडीसी पोलीस ठाण्याचे साहाय्यक पोलीस निरीक्षक माणिक चौधरी आणि पोलीस अंमलदार खामकर यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. पीडित महिलेने दिलेल्या तक्रारीवरून एमआयडीसी पोलिसांनी आरोपी सचिन बारस्कर याच्याविरुद्ध गुन्हा नोंदवला असून पुढील तपास सुरू आहे.



श्रीक्षेत्र मोहटादेवी देवस्थानचा पदभार अहिल्यानगरचे जिल्ह्याचे धर्मादाय उपआयुक्त नवनाथ जगताप यांनी नुकताच स्विकारला. याप्रसंगी देवस्थानचे विश्वस्त ॲड. नोटरी पब्लिक विक्रम वाडेकर

## नवनाथ जगताप यांनी स्वीकारला श्रीक्षेत्र मोहटादेवी देवस्थानचा पदभार

नगर – महाराष्ट्र शासनाने नुकताच महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियमामध्ये केलेल्या दुरुस्ती प्रमाणे व महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी दिलेल्या संमतीनुसार व अधिनियमातील तरतूदीनूसार, श्री मोहटादेवीचे पूजन करून श्रीक्षेत्र मोहटादेवी देवस्थानचा पदभार अहिल्यानगरचे जिल्ह्याचे धर्मादाय उपआयुक्त नवनाथ जगताप यांनी नुकताच स्विकारला. याबाबत महाराष्ट्राचे विधी व न्याय विभागाने नुकतीच अधिसुचना प्रकाशित करून महाराष्ट्रातील महत्वाचे देवस्थानचे नियमन दिवाणी अथवा जिल्हा न्यायालयाकडे होते, ते रद्द करण्याचे राजपत्र प्रकासित करून आता धर्मादाय आयुक्त यांची नियुक्ती केलेली आहे.

पदभार स्विकारताना नवनाथ जगताप यांनी भावीक भक्तांना जास्तीत जास्त सुविधा उपलब्ध करून देवून विश्वासाने देवस्थानचे कार्य यापुढेही सुरु ठेवू व देवस्थानचा नावलौकीक देशभरात वाढवू, श्रीक्षेत्र नाशिक येथे होत असलेला आगामी कुंभमेळा पर्णवीमध्ये मोहटादेवी गडावर येणाऱ्या भाविकाकरिता विशेष सुविधा देवस्थान मार्फत उपलब्ध करून दिल्या जातील, तसेच महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार व धर्मादाय आयुक्त महाराष्ट्र राज्य अमोघ कलोती यांचे मार्गदर्शनाखाली चांगला व पारदर्शक कारभार करु, मंदिर परिसर विकास कामावर भर देवू असे प्रतिपादन केले. यावेळी त्यांनी मंदिर परिसर व दानपेटी मोजदाद कार्यक्रमाची पाहणी केली. याप्रसंगी देवस्थानचे विश्वस्त ॲड. नोटरी पब्लिक विक्रम वाडेकर, बाबासाहेब दहिफळे, शुभम दहिफळे, बाळासाहेब लाहोटी, शशिकांत दहिफळे, राजेंद्र शिंदे, मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश भणगे, जनसंपर्क अधिकारी भीमराव खाडे, लेखपाल संदीप घुले तसेच सौ. ममता सुरदुशे (अधीक्षक) विनोद पाटील (निरीक्षक), जिजाबा कुंजीर, श्री कानिफनाथ देवस्थान मढीचे विश्वस्त महादेव कोकाटे व देवस्थानचे कर्मचारी उपस्थित होते.

# भ्रष्टाचाराविरुद्ध अहिल्यानगरमध्ये ‘लोककर्क भ्रष्टोबा’चा एल्गार; १२ जून रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अनोखे आंदोलन

### मत विक्री–खरेदीच्या प्रथेविरोधात ‘जनलोक सूर्यनामा’ ; भ्रष्ट प्रवृत्तींच्या सार्वजनिक निषेधासाठी जनजागृती मोहीम

नगर – समाजाच्या सर्व स्तरांमध्ये रुजलेल्या भ्रष्टाचार, प्रशासकीय कामचुकारपणा, मतांची खरेदी–विक्री आणि जनतेच्या मूलभूत हक्कांबाबतच्या उदासीनतेविरोधात पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसदच्या वतीने लोककर्क भ्रष्टोबा ही व्यापक जनजागृती मोहीम सुरू करण्यात आली आहे. या मोहिमेअंतर्गत येत्या १२ जून रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालया समोर राष्ट्रीय भ्रष्टोबांचा जनलोक सूर्यनामा हे अनोखे आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती ॲड. कारभारी गवळी यांनी दिली.

या आंदोलनाच्या माध्यमातून भ्रष्टाचाराला खतपाणी घालणाऱ्या सामाजिक प्रवृत्तींचा निषेध करण्यात येणार असून लोकशाही व्यवस्थेला पोखरणाऱ्या मत विक्री आणि मत खरेदीच्या प्रथेविरोधात जनजागृती केली जाणार आहे. आंदोलनासाठी प्रतीकात्मक स्वरूपात एका साध्या दगडाला शेंडी व शेंदूर लावून त्याला लोककर्क भ्रष्टोबा असे नाव दिले जाणार आहे. हा दगड कोणत्याही व्यक्तीचे प्रतिनिधित्व करत नसून समाजातील भ्रष्ट, स्वार्थी आणि लोकशाहीविरोधी म ानसिकतेचे प्रतीक म्हणून उभारला जाणार आहे.



याशिवाय मत विक्री आणि मत खरेदी या लोकशाहीसाठी घातक ठरत असलेल्या प्रथेचे प्रतीक म्हणून एक विशेष लाकडी खोकं तयार करण्यात येणार आहे. या मताच्या खोक्यात मतदारांनी आपली मतं विकण्याची किंवा मतांच्या बदल्यात स्वार्थ साधण्याची मानसिकता टाकून देण्याचे प्रतीकात्मक आवाहन करण्यात येणार आहे. हे खोकं भ्रष्टोबाला अर्पण करून मतदास्याच्या प्रथेचा सार्वजनिक निषेध व्यक्त केला जाणार आहे.

या संदर्भात माहिती देताना ॲड. कारभारी गवळी म्हणाले की, भ्रष्टोबा म्हणजे कोणतीही व्यक्ती नसून प्रत्येकाच्या मनात व मेंदूत घर करून बसलेली स्वार्थी प्रवृत्ती आहे. सत्ता, संपत्ती आणि प्रतिष्ठा मिळवण्यासाठी समाजहिताला दुय्यम मानणारी मानसिकता हीच भ्रष्टाचाराची खरी जननी आहे. त्यामुळे या आंदोलनाचा उद्देश कोणत्याही व्यक्तीला लक्ष्य करणे नसून भ्रष्टाचाराला समाजाने नकळत दिलेले महत्त्व, मतांची खरेदी–विक्री आणि अंधश्रद्धेसारख्या लोकशाहीला कमकुवत करणाऱ्या प्रवृत्तींचा निषेध करणे हा आहे.

आंदोलनाचे मुख्य आकर्षण असलेल्या जनलोक सूर्यनामा या संकल्पनेत सूर्याच्या साक्षीने सार्वजनिक सत्यपरीक्षा घेण्यात येणार आहे. भ्रष्टाचार, अनागोंदी कारभार, मतदास्य, सार्वजनिक विश्वासघात आणि जनतेच्या हक्कांवरील अतिक्रमण याबाबत जागृती करून नागरिकांना सजग करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. सम ाजाने भ्रष्टाचाराला देवत्व बहाल करू नये, मत विकू नये आणि लोकशाहीचे पावित्र्य जपावे, हा या आंदोलनाचा मुख्य संदेश राहणार आहे.

मतदान हे केवळ राजकीय प्रक्रिया नसून विवेकाचे पवित्र कर्तव्य आहे. शासन पाडण्यासाठी नव्हे, तर शासनाचे लोककल्याणात रूपांतर करण्यासाठी लोकशाहीचा वापर झाला पाहिजे, असा संदेशही या आंदोलनातून दिला जाणार आहे. तसेच स्वतःच्या महत्त्वाचे खत न करता मताची शुद्धी करा, व्यक्तीचा नव्हे तर भ्रष्ट प्रवृत्तींचा विरोध करा आणि भ्रष्टाचाराला देव बनवून त्याची पूजा करू नका अशा घोषणांद्वारे नागरिकांना सजग करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

या अनोख्या आंदोलनाच्या आयोजनासाठी अशोक सब्बन, प्रकाश थोरात, ॲड. अमित थोरात, शाहीर कान्हू सुंबे, ॲड. लक्ष्मणराव पोकळे, वीरबहादूर प्रजापती, संतोष खामकर, ओम कदम, पोपट शेळके, धनंजय मडके, कैलास पठारे, ॲड. विद्या शिंदे, राजेंद्र कर्डिले, दिलीप घुले, प्रकाश गोसावी यांच्यासह अनेक कार्यकर्ते प्रयत्नशील असून नागरिकांनी उपस्थित राहून भ्रष्टाचारविरोधी जनजागृती मोहिमेला पाठिंबा द्यावा, असे आवाहन केले आहे.

# ‘अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाविरोधात’ १० जूनपासून बीड येथून राज्यव्यापी लाँग मार्च; १५ जूनला नगरमध्ये सभा

### आरक्षणाच्या नावाखाली जाती–जातींत संघर्ष पेटवण्याचे सरकारचे कारस्थान : डॉ. सिद्धार्थ शिनगारे



अनुसूचित जातींमधील उपवर्गीकरण रद्द करण्याच्या मागणीसाठी १० जूनपासून बीड येथून निघणाऱ्या राज्यव्यापी लाँग मार्च १५ जून रोजी अहिल्यानगर शहरात येणार आहे. त्याच्या नियोजनार्थ फुले–शाहू–आंबेडकर चळवळीतील कार्यकर्त्यांची बैठक पार पडलेल्या बैठकीत बोलताना डॉ. सिद्धार्थ शिनगारे.

नगर – महाराष्ट्र सरकार आरक्षणाच्या मुद्द्यावरून विविध समाजघटकांमध्ये तेढ निर्माण करण्याचे काम करत असून, समर्थक जातींना एकमेकांविरुद्ध उभे करण्याचे षडयंत्र राबवत आहे. समाजातील विविध प्रश्नांपासून जनतेचे लक्ष विचलित करण्यासाठी जाती–जातींमध्ये संघर्ष, दंगली आणि वाद निर्माण करण्याचे कारस्थान सरकारकडून सुरू असल्याचा गंभीर आरोप अनुसूचित जाती उपवर्गीकरणाचे अभ्यासक डॉ. सिद्धार्थ शिनगारे यांनी केला.

अनुसूचित जातींमधील उपवर्गीकरण रद्द करण्याच्या मागणीसाठी १० जूनपासून बीड येथून निघणाऱ्या राज्यव्यापी लाँग मार्च १५ जून रोजी अहिल्यानगर शहरात येणार आहे. त्याच्या नियोजनार्थ फुले–शाहू–आंबेडकर चळवळीतील कार्यकर्त्यांची बैठक पार पडली. यावेळी ते बोलत होते. विजय भांबळ यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत एन. एम. पवळे, पी. पी. खंडागळे, निवृत्ती आरु, राजीव साळवे, सुहास धीवर, संजय कांबळे, धम्मपाल विद्याधर यांच्यासह विविध संघटनांचे कार्यकर्ते उपस्थित होते.




बैठकीत बोलताना डॉ. शिनगारे यांनी सरकारच्या आरक्षण धोरणावर टीका करताना सांगितले की, एससी उपवर्गीकरणाचा मुद्दा पुढे आलेला असताना त्यामधील ५८ जाती या उपवर्गीकरणाच्या विरोधात आहे. एकाच जातीची मागणी असून, त्यामधील निम्मे लोक देखील याला विरोध दर्शवित आहे. आरक्षणावरुन विविध जातींना एकमेकांविरोधात उभे केले जात आहे. हे सर्व कारस्थान सरकारपक्षातील व्यक्तींकडूनच राबविले जात असल्याचा आरोप त्यांनी केला.

आरक्षणावरुन ओबीसी आणि मराठा समाजातील संघर्ष देखील सरकारने लावून दिला आहे. धनगर समाज आदिवासी प्रवर्गात समावेशाची मागणी करत असताना आदिवासी आणि धनगर समाजात संघर्ष निर्माण करण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे गंभीर आरोपही त्यांनी यावेळी केले. समाजात ऐक्य निर्माण करण्याऐवजी विविध समाजघटकांना परस्परविरोधी बनवून राजकीय लाभ मिळविण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले.

डॉ. शिनगारे पुढे म्हणाले की, महाराष्ट्र शासनाने अनुसूचित जातींचे उपवर्गीकरण करण्याची प्रक्रिया सुरू केली असून त्याबाबत समाजात तीव्र असंतोष आहे. सर्वोच्च न्यायालयाने १ ऑगस्ट २०२४ रोजी उपवर्गीकरणासंदर्भात निर्णय दिला. त्यानंतर अवघ्या अडीच महिन्यांत आनंद बदर आयोगाने शासनाला अहवाल सादर केला. त्या अहवालाच्या आधारे राज्य सरकार उपवर्गीकरणाची प्रक्रिया राबवत आहे. मात्र भारतीय राज्यघटनेच्या कलम ३४१ नुसार अनुसूचित जातींच्या आरक्षणासंदर्भातील अधिकार राष्ट्रपती आणि संसदेला आहेत. असे असताना सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारांना अधिकार बहाल करून घटनाबाह्य आणि संविधानविरोधी निर्णय दिल्याचा दावा त्यांनी केला.

आनंद बदर आयोग हा एक सदस्यीय आयोग होता. आयोगाने राज्यभर दौरे केले नाहीत, विविध समाजघटकांच्या प्रतिनिधींशी व्यापक चर्चा केली नाही, मग कोणत्या माहितीच्या आधारे अहवाल तयार करण्यात आला, असा सवालही त्यांनी उपस्थित केला. हा अहवाल तातडीने सार्वजनिक करण्यात यावा, अशी मागणी करत अहवाल जाहीर न करताच उपवर्गीकरणाची प्रक्रिया राबविणे अन्यायकारक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

बैठकीच्या प्रारंभी एन. एम. पवळे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. सुहास धीवर यांनी प्रास्ताविक केले. अध्यक्षीय भाषणात विजय भांबळ यांनी अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाविरोधातील लढ्यात अहिल्यानगर जिल्ह्यातील फुले–शाहू–आंबेडकर चळवळीतील कार्यकर्ते संपूर्ण ताकदीने सहभागी होणार असल्याचे जाहीर केले. तसेच १५ जून रोजी अहिल्यानगरात येणाऱ्या लाँग मार्चला सर्व समाजघटकांना सहभागी होण्याचे सांगण्यात आले आहे.

### १० जूनपासून बीडहून लाँग मार्चची सुरुवात

अनुसूचित जातींमधील उपवर्गीकरण रद्द करण्याच्या मागणीसाठी १० जून रोजी बीड येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापासून राज्यव्यापी लाँग मार्चला प्रारंभ होणार आहे. सुमारे ५०० किलोमीटरचा हा मार्च २६ जून रोजी मुंबईतील आझाद मैदानावर धडकणार आहे. मार्चचा प्रवास विविध जिल्ह्यांतून होणार असून १२ जून रोजी तो जामखेड येथे पोहोचणार आहे. १५ जून रोजी अहिल्यानगर शहरात लाँग मार्चचे आगमन होणार असून, संध्याकाळी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळा परिसरात जाहीर सभा आयोजित करण्यात आली आहे. त्यानंतर १६ जून रोजी सुपा मार्गे हा मार्च पुण्याकडे रवाना होणार आहे.



पारनेर पोलीस ठाण्यात ३० मे रोजी दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्यात आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते सुमेध गायकवाड यांचे नाव अन्यायकारकपणे व खोट्या पद्धतीने समाविष्ट करण्यात आल्याचा आरोप करत, संबंधित गुन्ह्याची सखोल चौकशी करून तो मागे घ्यावा तसेच खोटी फिर्याद दाखल करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी समस्त आंबेडकरी समाजाच्या वतीने पोलीस अधीक्षक सुदर्शन मुमक्का यांना दिलेल्या निवेदनाद्वारे करण्यात आली.

## खोटा गुन्हा मागे घेऊन फिर्यादीवर कारवाई करा

### समस्त आंबेडकरी समाजाचे पोलीस अधीक्षकांना निवेदन

नगर – पारनेर पोलीस ठाण्यात ३० मे रोजी दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्यात आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते सुमेध गायकवाड यांचे नाव अन्यायकारकपणे व खोट्या पद्धतीने समाविष्ट करण्यात आल्याचा आरोप करत, संबंधित गुन्ह्याची सखोल चौकशी करून तो मागे घ्यावा तसेच खोटी फिर्याद दाखल करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी समस्त आंबेडकरी समाजाच्या वतीने पोलीस अधीक्षक सुदर्शन मुमक्का यांना दिलेल्या निवेदनाद्वारे करण्यात आली.

यावेळी अशोक गायकवाड, नगरसेवक सुरेश बनसोडे, सुनील शेत्रे, सुनील शिंदे, किरण दाभाडे, अमित काळे, विशाल कांबळे, जी. डी. गायकवाड, अनिल काळे, किरण गायकवाड, गौतम म्हस्के, प्रतीक सोनवणे, कौशल गायकवाड, विशाल भिंगारदिवे, सागर ठोकळ, सचिन शेलार, यशवंत भांबळ, सुनील हिवाळे, विलास साठे, प्रा. जाधव सर, गौतमी भिंगारदिवे, विवेक विधाते, महेश भोसले, सागर ढगे, बाळासाहेब सूर्यवंशी, संजय साळवे, विशाल गायकवाड, दिलीप साळवे, सिद्धांत गायकवाड, संघराज गायकवाड, सुजन भिंगारदिवे, कृष्णा गाडे, राजेंद्र शिरसाट, सिद्धार्थ राजगुरु, पोपटराव पाथरे यांच्यासह समाजबांधव उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर तसेच इतर महापुरुषांबाबत सोशल मीडियावर अवमानकारक मजकूर प्रसारित करून जातीय आणि धार्मिक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. या प्रकरणी मंगेश बरकसे यांनी पारनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. मात्र, या फिर्यादीत सुमेध गायकवाड यांचे नाव नमूद करून त्यांच्यावर गंभीर व खोटे आरोप करण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे.

सुमेध गायकवाड हे संबंधित घटनास्थळी उपस्थित नसतानाही त्यांचे नाव गुन्ह्यात गोवण्यात आले असून, यामुळे त्यांचे कुटुंबीय तसेच आंबेडकरी समाजामध्ये तीव्र नाराजी व संतापाची भावना निर्माण झाली आहे. खंडणीसारख्या गंभीर गुन्ह्यात विनाकारण नाव समाविष्ट करून त्यांची प्रतिमा मलीन करण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे.

या प्रकाराचा समस्त आंबेडकरी समाजाच्या वतीने तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला असून, संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून सुमेध गायकवाड यांच्यावरील कथित खोटा गुन्हा मागे घेण्यात यावा तसेच चुकीची व दिशाभूल करणारी फिर्याद दाखल करणाऱ्या संबंधित व्यक्तींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

# नाचण्याच्या वादातून तरुणावर कोयत्याने जीवघेणा हल्ला

### सहा जणांवर गुन्हा दाखल

नगर – नगर तालुक्यातील बायजाबाई जेऊर परिसरात नाचण्याच्या कार्यक्रमात धक्का लागल्यावरून झालेल्या वादात एका तरुणावर कोयत्याने जीवघेणा हल्ला करण्यात आल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सुमित संजय कोल्हे (वय ३२, रा गायकवाड हॉस्पिटल जवळ तपोवन रोड) यांनी फिर्याद दिली आहे. जेऊर परिसरात ३० मे रोजी नाचगाण्याचा कार्यक्रम सुरू असताना सुमीत कोल्हे आणि आरोपींमध्ये किरकोळ वाद झाला. नाचताना धक्का लागला, नीट नाचा, असे सुमीत यांनी आरोपींना म्हटले. या गोष्टीचा राग आल्याने आरोपी रोहन कैलास पाटोळे याने सुमीत यांच्यावर हातातील कोयत्याने थेट वार केला. हा वार अडवण्यासाठी सुमीत यांनी डावा हात मध्ये केला असता, कोयता त्यांच्या हाताला लागून ते गंभीर जखमी झाले. त्यानंतर अमित दिलीप पाटोळे याने सुमीत यांच्या डाव्या खांद्यावर कोयत्याने दुसरा वार केला. या हल्ल्यामुळे सुमीत खाली कोसळले.

सुमीत खाली पडल्यानंतर आरोपी रोहन पाटोळे, शुभम पाटोळे, अमित पाटोळे, अक्षय पाटोळे, दाद्या पाटोळे आणि कैलास पाटोळे (सर्व रा. जेऊर, ता.नगर) यांनी त्यांना लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. या घटनेनंतर जखमीला तातडीने उपचारासाठी रुग्णालयात हलवण्यात आले आहे.

सुमीत कोल्हे यांच्या तक्रारीवरून एमआयडीसी पोलिसांनी सहाही आरोपींविरुद्ध गुन्हा नोंदवला असून सहाय्यक पोलीस निरीक्षक माणिक चौधरी या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

